वर्ष ४६
अंक १

# बृहन्महाराष्ट्र वृत्त

बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मुखपत्र

|| मराठी तितुका मेळवावा ||

On the Web
www.bmmonline.org

**समस्त मराठीप्रेमींसाठी उत्तर अमेरिकेतील एकमेव मराठी मासिक**

जानेवारी २०२६
पौष / माघ
शके १९४७


नमस्कार मंडळी:



म्हणता म्हणता २०२५ सरले आणि २०२६ सुरू झाले. बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा, तसेच हे नवीन वर्ष तुम्हा सर्वांना सुखा-समृद्धीचे, उत्तम आरोग्याचे, आनंदाचे व भरभराटीचे जावो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

२०२५ साल, हे बृहन्महाराष्ट्र मंडळाने दणक्यात साजरे केले. भरपूर कार्यक्रम आणि नवे नवे उपक्रम! तुम्हा सर्वांनी दिलेली साथ ही निश्चितच कौतुकास्पद आहे. तुम्ही केलेल्या सहकार्याने आम्हा मंडळींना नुसता हुरूपच नाही, तर अनेक नवीन कार्यक्रम घेऊन येण्याच्या कल्पना सुचल्या आणि अंमलात पण आणता आल्या. त्याबद्दल खूप खूप धन्यवाद!

गेल्या वर्षी साजरे झालेले दोन मोठे कार्यक्रम म्हणजे बृहन्महाराष्ट्र मंडळाचे मैत्री मेळावे - पहिला डॅलसला, तर दुसरा क्लीव्हलंडला. या मैत्री मेळाव्यांमुळे या दोन्ही शहरांच्या आजूबाजूची मंडळे एकत्र आली आणि त्यामुळे बऱ्याच स्थानिक कलाकारांना त्यांच्यी कला खूप मोठ्या प्रेक्षकवर्गासमोर सादर करता आली.

गेल्या वर्षी भारतातून आम्ही बहुरंगी अनेक कार्यक्रम आणले. धनश्री लेले यांची व्याख्याने, डॉक्टर सलील कुलकर्णी यांचा संगीत दौरा, प्रिया बापट-उमेश कामत यांचे "जर तर ची गोष्ट" हे नाटक, तसेच प्रशांत दामले यांचा "शिकायला गेलो एक" या नाटकाचा १६ प्रयोगांचा विक्रमी दौरा - हे सगळे कमी की काय म्हणून "मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी", "फसक्लास दाभाडे", "फुलवंती", "असंभव" हे चित्रपट, तर विक्रमी ४० प्रयोग झालेला "अभंग तुकाराम" हा चित्रपट - केवळ आणि केवळ तुमच्या सहकार्यामुळेच शक्य झाले.

गेल्या वर्षी मराठी शाळेने प्रचंड प्रगती करत सर्व जुने विक्रम तोडले. आम्ही, उत्तर अमेरिकेत, तसेच परदेशात अनेक नव्या मराठी शाळा सुरू केल्या. शाळेच्या शिक्षकांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या सर्व पुस्तकांची उजळणी करून आवश्यक त्या सुधारणा केल्या, त्याचप्रमाणे प्रत्येक इयत्तेतील शिक्षकांना उपयुक्त होईल अशा "शिक्षक मार्गदर्शिका" पण प्रकाशित केल्या. उत्तर अमेरिकेतील तसेच काही परदेशातील विद्यार्थ्यांनी पहिल्यांदाच "महाराष्ट्र शासनाच्या मराठीच्या परीक्षा" देऊन प्रमाणपत्रे मिळवली.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्त समितीचे विशेष कौतुक म्हणजे दर महिन्याच्या एक तारखेला अंक वाचकांसाठी तयार असतो. सर्व वृत्त समिती सदस्य उत्साहाने या कामात भाग घेतात. मी या सर्व वृत्त समिती सदस्यांचे आभार मानतो.**

गेल्या वर्षी "रेशीमगाठी संकेतस्थळा"चे प्रथम टप्प्यातील नूतनीकरण पूर्ण झाले असून, यावर्षी दुसऱ्या टप्प्यात अधिक सुधारणा करण्यात येणार आहेत. तसेच गेल्या वर्षी आम्ही न्यू जर्सी व बे एरिया मध्ये "रेशीमगाठी मेळावे" साजरे केले. दोन्ही मेळाव्यांना उत्तम प्रतिसाद मिळाला. यावर्षी पण अधिकाधिक मंडळी या उपक्रमात भाग घेतील अशी आमची अपेक्षा आहे. तरी आम्हाला सहकार्य करावे ही नम्र विनंती.

गेल्या वर्षी 'समाजरंग'तर्फे ज्येष्ठ समाजसेवक यजुर्वेंद्र महाजन यांचा झंझावती दौरा आम्ही आयोजित केला होता. त्यांनी सव्वा महिन्यात १७ शहरांना भेटी देऊन अनेक लोकांशी संवाद साधला. त्याचं धर्तीवर यावर्षी पण आम्ही अजून काही प्रसिद्ध समाजसेवकांचे दौरे आयोजित करीत आहोत, ज्यायोगे त्यांच्या कार्याची तुम्हाला जवळून ओळख होईल, तसेच त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी पण उपलब्ध होईल.

गेल्या वर्षी मराठवाड्यातील पूरग्रस्त लोकांच्या मदतीसाठी केलेल्या निधी संकलनाला तुम्ही दिलेला प्रतिसाद वाखाण्याजोगा होता. $२५,००० ते लक्ष्य आरामात पार करत आपण $३२,५०० पेक्षा अधिक रक्कम जमवली. या विषयावरील सविस्तर वृत्तांत या अंकात तुम्हाला वाचायला मिळेल.

त्याचप्रमाणे गेल्या वर्षी ज्योतिषशास्त्र, लक्ष्यवेधी, अर्थमंथन, आणि कीर्तन हे नवे उपक्रम सुरु झाले. नव्या वर्षात आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करणारा "आरोग्य संपदा" हा एक नवा उपक्रम आम्ही घेऊन येत आहोत. आमचे इतर उपक्रम उत्तररंग, B-Connect, ध्यान, तत्त्वज्ञान, पौरोहित्य, शास्त्रीय / सुगम संगीत, भाषा, Karaoke, वारसा, युवा, चित्रकला, आणि क्रीडा, उत्तम रीतीने चालू आहेत. या सर्व उपक्रमांना भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल मी बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे तुम्हा सर्वांचे आभार मानतो.

सिॲटल् अधिवेशनाची तयारी जोरात सुरू आहे. आम्ही मकर संक्रांतीच्या दिवशी तिकीट विक्री सुरू करीत आहोत. त्याबद्दलची घोषणा नुकतीच करण्यात आली. लवकर तिकीट नोंदणी करणाऱ्यांना पुढे बसायची संधी मिळणार आहे. तरी तिकीट काढायला उशीर करू नका. आम्ही तुम्हा सर्वांसाठी दर्जेदार कार्यक्रम घेऊन येत आहोत. तुमच्या आवडीच्या कलाकारांना भेटण्याची ही एक उत्तम संधी आहे.

नि:स्वार्थीपणे मला सहकार्य करणाऱ्या आमच्या समितीतील सर्वांचे, विश्वस्तांचे, विविध मंडळांचे अध्यक्ष, प्रतिनिधी, मुख्याध्यापक, शिक्षक वर्ग, तसेच सर्व स्वयंसेवकांचे खूप खूप धन्यवाद!

नवीन वर्षाच्या परत एकदा शुभेच्छा, तसेच मकर संक्रांतीच्या आणि भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या पण तुम्हा सर्वांना शुभेच्छा!

जय हिंद - जय महाराष्ट्र! आपला,

**- प्रसाद पानवळकर** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

**बृहन्महाराष्ट्र वृत्त**
बृहन्महाराष्ट्र मंडळ उत्तर अमेरिका या संस्थेचे मुखपत्र
स्थापना १९८१ (शिकागो)
संस्थापक:- कै. विष्णु वैद्य, कै. शरद गोडबोले, कै. जयश्री हुपरीकर
अंकासाठी साहित्य/मजकूर पाठविण्याचा पत्ता:
ईमेल: vrutta@bmmonline.org
बृहन्महाराष्ट्र वृत्त कार्यालय संपर्क :-
**BMM Treasurer - Santosh Salvi**
**4 Azalea Lane, Nashua, NH 03062**
**Ph: 603 438 9279**
**Email: santosh.salvi@bmmonline.org**

**जाहिरातींचे दर:** पूर्ण पान: $ 200 अर्धे पान: $ 125
पाव पान: $ 100 अष्टमांश पान: $ 75
**Send your payments to: zelle@bmmonline.org**

वृत्त दर महिन्याला प्रसिद्ध होते. **आदल्या महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आलेल्या मजकुरातून निवडक मजकूर नजीकच्या अंकात प्रसिद्ध करण्याचे सर्व प्रयत्न केले जातील.** लेखासाठी जास्तीत जास्त १ ते २ पानांचा मजकूर मराठीत लिहून MS word मध्ये पाठवावा. प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतातच असे नाही. लिखाणाच्या निवडीचे, प्रकाशन योग्य किरकोळ बदलाचे आणि व्याकरणीय दुरुस्तीचे अंतिम अधिकार संपादकांकडे राहतील.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाची कार्यकारिणी (२०२४ - २०२६)**
**मताधिकार असलेले सदस्य**
अध्यक्ष: प्रसाद पानवळकर, ऑस्टिन, टेक्सस
सचिव: नरेंद्र कल्याणकर, रॅले, नॉर्थ कॅरोलायना
कोषाध्यक्ष: संतोष साळवी, नाशुवा, न्यू हॅम्पशायर
सदस्य: पुरू ठाकरे, रिचमंड, व्हर्जिनिया
मेधा गोडबोले, क्लिव्हलँड, ओहायो
गौरव पटवर्धन, सॉल्ट लेक सिटी, युटा
राहुल देशमुख, पिट्सबर्ग, पेनसिल्व्हेनिया
आनंद चौथाई, एडिसन, न्यू जर्सी
**नियुक्त सदस्य**
माजी अध्यक्ष: संदीप दीक्षित, क्लिव्हलँड, ओहायो
**विश्वस्त समिती**
अध्यक्ष : नितीन जोशी, शिकागो, इलिनॉय
सदस्य: सुनील सूर्यवंशी, रिजफील्ड, कनेटिकट
सदस्य: मंजुषा नाईक, वेस्ट पाम बीच, फ्लोरिडा
प्रकाशक: बृहन्महाराष्ट्र मंडळ, उत्तर अमेरिका

**Disclaimer:** The advertised business is a wholly independent entity from Bruhan Maharashtra Mandal (BMM). BMM is neither liable nor responsible for any actions or communications between third parties and the advertised businesses, including parents and subsidiaries of the advertised businesses.

## या अंकात

| | |
|---|---|
| अध्यक्षीय | १ |
| बृ. म. मंडळ कार्यकारिणी व संपादक समिती | २ |
| २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल | ३ |
| सिॲटल अधिवेशन - पडद्यामागची कथा | ४ |
| बृहन्महाराष्ट्र मंडळाचा यशस्वी उपक्रम: भारतीय कार्यक्रम | ५ |
| ‘अभंग तुकाराम’ चित्रपटाचे जगभरातील मराठी शाळांमध्ये यशस्वी प्रदर्शन | ७ |
| मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी संकलन अहवाल | ७ |
| शिवछत्रपती अभ्यास वर्ग | १० |
| मकर संक्रांती आणि सूर्यदेव | १० |
| कविता: थेंब.... | १२ |
| उत्तररंग | १२ |
| कविता: नवीन वर्षाच्या शुभेच्छा! | १४ |
| दिवाळी किल्ला स्पर्धा | १५ |
| आवाहन: अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख | १७ |
| दण्डक्रमविक्रमादित्य वेदमूर्ति श्री. देवव्रत महेश रेखे गौरव समारंभ | १७ |
| तुमचा उत्कर्ष तुमच्या हातात | १८ |
| यक्षप्रश्न | १९ |
| मराठी भाषा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) | २१ |
| नाती...! | २३ |
| ग्रेटर रिचमंड मराठी मंडळ | २३ |
| (काव्यस्पर्धा) प्रेम, प्रेम म्हणजे .... | २४ |
| सूर्यमालेपलीकडून आलेला अलीकडचा पाहुणा: 3I/ATLAS | २५ |
| पु. ना. गाडगीळ (पीएनजी) ज्वेलर्स - एक सोनेरी परंपरा | २७ |
| कॅरम स्पर्धा | ३० |
| जाहिरात | ३१ |
| MANA Paintings | ३२ |

## संपादक समिती

अपर्णा कोळेकर
नीता धोपेश्वरकर
विदुला कोल्हटकर
अनिता कांत
कोमल कुलकर्णी
शुभदा सावरगावकर
शीतल रांगणेकर
प्रसाद पानवळकर

हया अंकाबाबत तुमचे मत नक्की कळवा :
Email - Vrutta@Bmmonline.org
आलेल्या प्रतिक्रियां पैकी, निवडक प्रतिक्रिया पुढच्या अंकात प्रसिद्ध केल्या जातील. शब्दमर्यादा: १०० शब्द.

## २०२६ सिॲटल अधिवेशन अहवाल

'बीएमएम वृत्त'च्या सर्व वाचकांना नमस्कार. सर्वांना नववर्षाच्या आणि मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा! २०२५ वर्ष बघता बघता संपलं देखील. गतवर्षीच्या अनेक आठवणी, अनुभव तसेच नवीन स्वप्नं सोबत घेऊन आपण नववर्षात पाऊल टाकले आहे. आणि हो, बीएमएम२०२६ची तयारी सुद्धा आता आणखी जोमात सुरू झाली आहे!

**आनंदाची बातमी!** 🎉 येत्या मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर नोंदणी आणि तिकीट विक्री अर्थातच Registration सुरु होत आहे. Stay Tuned! याच वेळी आम्ही आगामी काही महत्त्वाचे कार्यक्रम, उपक्रम आणि आकर्षणेही जाहीर करणार आहोत. नवीन वर्ष म्हणजे नवी ऊर्जा आणि बीएमएम२०२६च्या प्रवासाच्या तिसऱ्या टप्प्यातील नवी सुरवात! ह्या प्रवासात या बीएमएम२०२६च्या केंद्रस्थानी आहे – **'ती' चा सन्मान, स्त्रीत्वाचा गौरव – Celebration of Womanhood.** 💐🙏




ती म्हणजे उर्मी, उर्जा, प्रीती, महत्वाकांक्षा, जबाबदारी, ती आपली मायभूमी, मायबोली, आपली संस्कृती, अस्मिता; माता, भगिनी, मुलगी, बायको, प्रियसी. ती जी आपल्याला पहिलं बाळकडू देते, जी नाती विणायला शिकवते, जी आपल्याला जगायला शिकवते, आणि आपल्याला घट्ट जोडून ठेवते, तीच आहे आपली ओळख, तीच आहे आपली शक्ती! ती संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. नात्यांची वीण, मूल्यांची शिदोरी, आणि पुढच्या पिढीची दिशा — हे सगळं तिच्याच हातात असतं. त्यासाठी **'ती'** चा सन्मान!!! बीएमएम२०२६ मध्ये केवळ साडेतीन दिवसांचे कार्यक्रम नसून एक असा प्रवास असावा जो स्थानिक मराठी मंडळांपासून राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मराठी समुदायाला एका समान धाग्याने जोडेल. आणि ह्याचाच भाग म्हणून आम्ही जानेवारीपासून दर महिन्याला स्त्रीत्वाचा सन्मान करणार आहोत. ह्या सन्मानासाठी भारतामधील आपापल्या क्षेत्रात नाव कमावलेल्या आणि अमेरिकेतील आपल्या आसपासच्या, आपल्यातल्याच प्रेरणादायी, कर्तृत्ववान स्त्रियांना आम्ही मानचिह्न देऊन पुरस्कृत करू. हा सन्मान पुढील पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी वारसा ठरेल.

बीएमएम२०२६ मध्ये असणार आहेत, विविध वयोगटांसाठी, विविध आवडींसाठी स्पर्धा. कला, साहित्य, संगीत, सादरीकरण, सर्जनशीलता — प्रत्येकासाठी काहीतरी खास! सर्व स्पर्धांची तसेच उद्योग महोत्सव – EXPO बद्दलची माहिती आमच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

बीएमएम २०२६ यशस्वी करण्यासाठी आपले देणगी स्वरूपातले योगदान अत्यंत मोलाचे आहे. तुम्ही अजून डोनेशन पॅकेज विकत घेतलं नसेल तर लवकरात लवकर घ्या. ह्याबद्दलची सर्व माहिती आमच्या संकेतस्थळावर bmmseattle2026.org/individual-donor-package-tiers आणि समाजमाध्यमांवर (social media) उपलब्ध आहे. अधिक माहिती वा शंका निरसनासाठी ह्या इमेल-पत्त्यावर संपर्क साधावा - donations@bmmseattle2026.org

स्नेहसंमेलनाच्या यशासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची नितांत गरज आहे. त्यामुळे तिकीट विक्री चालू होताच लवकरात लवकर आपली नोंदणी करा. जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हा, आपल्या कुटुंबीयांना, मित्रांना सोबत आणा, आणि बीएमएम२०२६चा अविस्मरणीय आनंद अनुभवायला सिॲटल् ला नक्की या!

आपण संमेलनाशी संबंधित बातम्या, घडामोडी आणि गमती जमती आमच्या समाजमाध्यमांतून बघू शकता.

**संकेतस्थळ:** bmmseattle2026.org
**युट्युब चॅनेल:** www.youtube.com/@BMM2026SEATTLE
**फेसबुक पेज:** www.facebook.com/bmm2026seattle
**फेसबुक ग्रुप:** www.facebook.com/groups/bmm2026seattle
**इंस्टाग्राम:** www.instagram.com/bmm2026seattle
**इमेल-पत्ता:** स्नेहसंमेलनासंबंधीच्या सूचना, अभिप्राय आणि प्रश्नांसाठी– info@bmmseattle2026.org

**आपली साथ, आपला सहभाग —**
**हाच आमचा खरा उत्साह आहे.** 🙏🌸

- **अश्विनी क्षीरसागर,** बीएमएम२०२६ समिती

## सिॲटल अधिवेशन - पडद्यामागची कथा

गेले काही महिने सिॲटल अधिवेशनाबद्दल अनेक बातम्या चर्चा तुमच्या कानावर आल्या असतीलच. त्यातल्या खऱ्या किती, खोट्या किती याविषयी पण तुमच्या मनात संभ्रम झाला असेल. बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून तिकीटविक्री विषयी कोणतेही स्पष्टीकरण अजून येत नाही हे पाहून काही लोकांनी आम्हाला थेट प्रश्न विचारायला सुरुवात केली. या लेखातून या संमेलनाची तिकीट विक्री जाहीर करायला उशीर का झाला याची माहिती मिळवू या.

थोडे मागे जाऊन बघितले तर २०२४ च्या ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यापासूनच सिॲटल मंडळातील मंडळींनी एकत्र येऊन उत्साहाने काम सुरू केले. वेगवेगळे गट तयार झाले आणि स्वयंसेवकांनी वाहून दिलेली कामे करायला सुरुवात केली. मधल्या काळात सिॲटल कन्व्हेन्शन सेंटर आणि शेरेटन हॉटेल बरोबर करारावर स्वाक्षऱ्या देखील झाल्या. मात्र सिॲटल कन्व्हेन्शन सेंटरच्या कामगार संघटनेच्या जाचक नियमांमुळे भोजन व्यवस्थेचा खर्च प्रमाणाबाहेर होणार असल्याचे नंतर लक्षात आले. भोजन समितीने तसा अहवालही सादर केला आणि त्यानंतर सुरू झाल्या त्या वाटाघाटी.

सिॲटलच्या अधिवेशन समितीने सिॲटल कन्वेंशन सेंटर बरोबर जवळजवळ बारा बैठका घेतल्या, मात्र त्याला काही यश येत नव्हते. त्यानंतर या प्रकरणात बृहन्महाराष्ट्र मंडळाने लक्ष घातले. अधिक माहिती घेतल्यावर आमच्या लक्षात आले की आमच्याकडे हे दोन पर्याय आहेत: एक तर अधिवेशन रद्द करणे किंवा अधिवेशनाच्या तिकिटांची किंमत वाढवणे - हे दोन्ही पर्याय म्हणजे "इकडे आणि तिकडे विहीर".

याचवेळी अधिवेशन रद्द करणे हेही तितके सोपे नाही असे वकिलाने आम्हाला सांगितले, कारण करानुसार, करार रद्द केल्याबद्दल होणाऱ्या दंडाची रक्कम पण जास्त होती, त्यामुळे जास्तीचे तिकीट आकारून कमी उपस्थिती असलेले अधिवेशन करून तोटा सहन करायचा की अधिवेशन रद्द करून दंड भरून तोटा सहन करायचा हा प्रश्न होताच. अधिवेशन रद्द केले तर अनेक स्वयंसेवकानी इतके महिने घेतलेली मेहनत फुकट जाणार आणि तिकिटांची किंमत जास्त ठेवली तर अधिवेशनाच्या उपस्थितीवर चांगलाच फरक पडणार.

अशा बिकट प्रसंगी सर्वांनी वकिलाची मदत घ्यायचे असे ठरले. मग वकिलाला बरोबर घेऊन आम्ही सिॲटल् कन्व्हेन्शन सेंटर आणि शेरेटन हॉटेल बरोबर बैठक घेतली आणि त्यांना "भोजन खर्च" या विषयाची समस्या सांगितली. आम्हाला केवळ याच कारणामुळे माघार घ्यावी लागेल असेही सांगितले. त्यावेळी सिॲटल कन्व्हेन्शन सेंटर व शेरेटनने सहकार्य करायची तयारी दर्शवली. भोजन व्यवस्थेचा खर्च आवाक्यात आणणे हा मोठा प्रश्न अजूनही होताच. त्यानंतर सिॲटलच्या अधिवेशन समितीने सिॲटल कन्व्हेन्शन सेंटर व वकिलासोबत अनेक बैठका घेऊन भोजन खर्चात कपात केली. तसेच सिॲटल कन्वेंशन सेंटरमधले इतर खर्च कमी केले. शेरेटनने पण सहकार्य दाखवत करारामधील काही अटी शिथिल करून थोडीफार सवलत दिली. शेवटी अधिवेशन समितीतील सर्वांच्या संमतीने अधिवेशन करायचे ठरले आणि तशी घोषणा आम्ही गेल्या महिन्यात केली. त्यानंतर सर्व कार्यकर्ते परत एकदा जोमाने कामाला लागले आहेत.

जागतिक मंदी, त्यामुळे होणारी नोकर कपात, वाढती महागाई, अमेरिकन सरकारने भारतावर लादलेले जास्तीचे आयात शुल्क, या सर्व आव्हानांना झेलून आम्ही हे अधिवेशनाचे शिवधनुष्य उचलण्याचे आवाहन स्वीकारत आहोत. बे एरिया अधिवेशनाच्या तिकीटाएवढीच किंमत आम्ही २ वर्षांनंतर होणाऱ्या अधिवेशनाला "Early Bird Discount" मध्ये ठेवत आहोत. जितके लवकर तिकीट काढाल, तेवढे नक्की पुढे बसायला मिळणार. मित्रमंडळींनी ठरवून एकाच वेळी तिकीटे काढलीत, तर एकत्रपण बसता येईल. १४ जानेवारी २०२६ रोजी, मकर संक्रांतीच्या शुभमुहूर्तावर आम्ही तिकीट विक्री सुरु करीत आहोत. आता आम्हाला फक्त तुमच्या सहकार्याची आणि शुभेच्छांची गरज आहे.

कृपया तुमच्या मंडळातील मित्रमंडळींना या अधिवेशनाबद्दल नक्की कळवा आणि लवकरात लवकर तिकिटे काढून आम्हाला सहकार्य करा. त्याचप्रमाणे तुम्हाला कोणी प्रायोजक माहित असतील तर आम्हाला नक्की कळवा, तसेच तुमच्यापैकी कोणाला आर्थिक देणगी द्यायची असेल तरीही कळवा.

तुमच्या सगळ्यांच्या सहकार्याने हे अधिवेशन यशस्वी होईल यात कोणतीही शंका नाही. आपल्या सहकार्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे

आपला,

- **प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन महाराष्ट्र मंडळ

## बृहन्महाराष्ट्र मंडळाचा यशस्वी उपक्रम: भारतीय कार्यक्रम

**बृहन्महाराष्ट्र मंडळाचा यशस्वी उपक्रम: भारतीय कार्यक्रम (भारतीय कलाकारांचे उत्तर अमेरिकेत होणारे कार्यक्रम)**

उत्तर अमेरिकेतील महाराष्ट्रीयन कलाप्रेमी भारतातील कलाक्षेत्रात गाजत असलेल्या नाटक, चित्रपट, व्याख्याने, नृत्य आणि संगीतविषयक कार्यक्रमांबाबत नेहमीच उत्सुक असतात. हे नवनवीन कार्यक्रम आपल्याला कधी बघायला मिळतील अशी ओढ त्यांना सतत लागलेली असते. भारतभेटीच्या लघु आणि व्यस्त कालखंडात सर्वच कार्यक्रम अनुभवता येत नाहीत. म्हणूनच बृहन्महाराष्ट्र मंडळाची समिती अमेरिकेतील प्रेक्षकांसाठी थेट भारतातून दर्जेदार कार्यक्रम घेऊन येण्यासाठी कार्यरत आहे. या उपक्रमाचे संचालक **पुरु ठाकरे** आणि त्यांचे सहकारी, **हर्षद अणिगेरी**, **दीप्ती कान्हेरे**, **केतन काळे** यांच्याशी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्ताच्या समितीने दिलखुलास गप्पा मारल्या, त्याचा हा गोषवारा.

**वृत्त समिती:** नमस्कार, या वेळच्या बृ. म. मं च्या भारतीय कार्यक्रमाच्या चमूने बहारदार कार्यक्रमांचा धूमधडाका लावला आहे, त्याबद्दल अभिनंदन. ह्या समितीने कोणते उद्दिष्ट्य आपल्या समोर ठेवले होते आणि ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणते धोरण वापरले गेले?

**पुरु:** दर्जेदार कार्यक्रम आणायचे आणि ते लहानात लहान मंडळांच्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवायचे ही दोन उद्दिष्टे २०२४ साली काम सुरु करताना डोळ्यांसमोर होती. त्यासाठी योग्य कार्यक्रमांची निवड करणे, एक सक्षम चमू तयार करणे तसेच सातत्याने स्थानिक मंडळांच्या संपर्कात राहणे, या तीन गोष्टींवर भर दिला गेला. यामुळेच हे दणदणीत यश आम्ही मिळवू शकलो.

**वृत्त समिती:** २०२४-२५च्या वर्षात नाटक, चित्रपट, व्याख्याने यांची रेलचेल होती....

**पुरु:** हो, शिकायला गेलो एक या नाटकाचे १६ प्रयोग; जर तरची गोष्ट या नाटकाचे ४ प्रयोग, धनश्री लेले यांच्या व्याख्यानाचे १० प्रयोग झाले. आपण सहा चित्रपट दाखवले: फर्स्टक्लास दाभाडे, मुक्कामपोस्ट बोंबीलवाडी, फुलवंती, बिन लग्नाची गोष्ट, असंभव आणि अभंग तुकाराम. पूर्ण अमेरिकेत या सर्व चित्रपटांचे उत्तम स्वागत झाले. अभंग तुकाराम हा चित्रपट ४०हून अधिक शाळांत दाखवला गेला. तसेच, डॉक्टर सलील कुलकर्णी आणि शुभंकर कुलकर्णी यांचा धरोहर हा कार्यक्रमही अनेक शहरांतील रसिकांनी नावाजला.

**वृत्त समिती:** या समितीने खरोखरच लक्षवेधी कामगिरी केली आहे. ह्या सगळ्या मंडळींना एकत्र कसे आणलेत?

**पुरु:** आम्ही सूत्रे हाती घेतल्यावर बृ. म. मं. ने स्वयंसेवकांना ह्या समितीवर काम करण्यासाठी आवाहन केले होते. त्यानुसार अनेकांनी आमच्याशी संपर्क साधला. अनुभवी आणि जाणकार लोकांसोबतच नवीन आणि उत्साही लोक आमच्याबरोबर जोडले गेले. आपण घेतलेल्या जबाबदारीची जाणीव ठेऊन या कामासाठी वेळ देणाऱ्या कार्यकर्त्यांमुळेच आम्ही ही सफलता प्राप्त करू शकलो. दीप्तीसारख्या नवीन आणि हरहुन्नरी सदस्यांमुळे धनश्रीताईचा दौरा आम्ही मोठ्या जोमाने पार पाडू शकलो. याशिवाय कलाकारांच्या अमेरिकन व्हिसाची व्यवस्था करणाऱ्या स्वप्नाली केळकर, Click on Tours चे अतुल परळकर, नाटकाच्या दौऱ्याची आखणी आणि व्यवस्थापन करणारे सुमीत चव्हाण आणि केतन काळे यांच्यासारख्या व्यावसायिकांचीही खूप मदत झाली.

**वृत्त समिती:** भारतातून कुठला कार्यक्रम आणायचा हे कसे ठरविले जाते?

**पुरु:** भारतात लोकप्रिय झालेले कार्यक्रम तसेच आपल्या प्रेक्षकांकडून आलेल्या फर्माईशी यांचे आम्ही ध्यान ठेवतो. तसेच आपल्या समितीतील सदस्यांचेही बऱ्याच कलाकारांशी स्नेहसंबंध आहेत. त्यांचीही मदत होते. तसेच भारतातूनही अनेक कलाकार आम्हाला प्रस्ताव पाठवतात. या यादीतून जे कार्यक्रम लोकप्रिय आहेत आणि आर्थिकदृष्ट्या परवडू शकतील अशा कार्यक्रमांवर भर दिला जातो. त्या कार्यक्रमाच्या निर्मात्यांशी बोलून त्यांच्या उपलब्ध असलेल्या तारखा, मानधन, प्रायोजक याबाबतीत विचार विनिमय होतो आणि कार्यक्रमाची निवड होते. महाराष्ट्र मंडळांचा सहभागही तितकाच महत्त्वाचा.

**वृत्त समिती:** ही सगळी प्रक्रिया कशी असते हे आमच्या वाचकांना जाणून घ्यायला आवडेल.

**पुरु:** कार्यक्रमाची निवड झाल्यावर आम्ही त्या त्या कलाकारांकडून किंवा त्यांच्या प्रतिनिधींकडून एक फॉर्म भरून घेतो. त्यानंतर कार्यक्रमाचा प्रस्ताव आम्ही मंडळांकडे पाठवतो. शनिवार-रविवार या दिवसांचे मानधन अधिक असते. शुक्रवारी किंवा आठवड्यातील इतर वारांचे मानधन त्यामानाने कमी असते. तसेच कलाकारांना पुढच्या

शहरात लगेच प्रवास करता येईल, याचेही ध्यान ठेवले जाते. दौऱ्याची शहरे निश्चित झाली की त्यानंतर व्हिसाचे काम सुरु होते. त्यासाठी कागदपत्रे पाठवणे, अमेरिकन दूतावासांत कलाकारांच्या मुलाखतीची वेळ ठरविणे, त्यांच्या अमेरिका दौऱ्यासाठी योग्य व्यक्तींकडून शिफारसपत्रे मिळविणे इत्यादी गोष्टीत बऱ्यापैकी वेळ खर्च होतो. एकदा सर्व कलाकारांचा व्हिसा मिळाला की विमानाची तिकिटे तसेच प्रत्येक शहरात राहण्याची आणि प्रवासाची सोय मंडळांच्या सहकार्याने केली जाते. कार्यक्रमासाठी लागणारे नेपथ्य आणि इतर पूरक गोष्टी यांच्याकडेही खास ध्यान दिले जाते.

**वृत्त समिती:** या दौऱ्यांच्या काही संस्मरणीय आठवणी असतील....

**पुरु:** शिकायला गेलो एक या दौऱ्यात एका ठिकाणी पाठवलेले फ्लेक्स म्हणजे नेपथ्यातील पडदा काही मंडळांना पोहोचलाच नाही. मग राले मंडळाने मोठा ट्रक भाड्याने घेऊन आधीच्या मंडळाकडून तो मिळवला. तसेच एकदा सर्व कलाकारांच्या बॅगा त्यांच्या "फायनल डेस्टिनेशन"ला म्हणजे पुढच्या शहरात गेल्या. मग काय प्रशांत दामले यांना आपला कुडता देण्यासाठी लोकांची हीSS झुंबड उडाली. म्हणतात ना, The Show Must Go On!

**वृत्त समिती:** धनश्रीताईंचा कार्यक्रम एकपात्री होता, त्याचा अनुभव कसा होता?

**दीप्ती:** आम्हाला या कार्यक्रमाचा खूप सुंदर अनुभव आला. रामकथा आणि ज्ञानेश्वर माऊली या विषयांवर ताईंचे व्याख्यान ठिकठिकाणच्या श्रोत्यांना अतिशय भावले. त्यांनी स्थानिक कलाकारांनाही गीत म्हणण्याची संधी दिली.

काही ठिकाणी गुरुवार-शुक्रवार अशा दिवशीही कार्यक्रम झाले. तसेच एका दिवशी दोन वेगळ्या शहरांतही कार्यक्रम झाले. काही उत्साही मंडळींनी त्यांना स्वत: गाडी चालवून पुढच्या कार्यक्रमाच्या शहरी नेऊन पोहोचवले.

**वृत्त समिती:** लहान मंडळांसाठी तुम्ही काय सवलत दिली होती?

**पुरु:** लहान मंडळाचे आर्थिक गणित वेगळे असते. त्यांना मंगळवार ते शुक्रवार कार्यक्रम करण्याची संधी दिली. शिकायला गेलो एक या नाटकाचे प्रयोग सिनसिनाटीसारख्या शहरांत बुधवारी किंवा गुरुवारी झाले. तसेच छोट्या मंडळांना काही विशेष सवलती देऊ शकलो. जसे, धनश्रीताईंना पुढच्या शहरात गाडीने पोहोचवून दिलेल्या मंडळांना तेव्हढी सूट मिळाली.

**वृत्त समिती:** या वर्षी चित्रपटांचीही संख्या अधिक होती. त्याचे आर्थिक नियोजन कसे असते?

**पुरु:** चित्रपटांसाठी आम्हाला निर्मात्यांना प्रत्येक खेळासाठी ठराविक मानधन द्यावे लागते तसेच DCP आणि KDM यांसारख्या तांत्रिक बाबींसाठीही रक्कम मोजावी लागते. स्थानिक मंडळाला चित्रपटगृहाचे भाडे आणि हा वरचा खर्च असे मिळून तिकीट लावावे लागते. त्यामुळे चित्रपट यशस्वी असेल तरच तो इथे प्रदर्शित करता येऊ शकतो.

**वृत्त समिती:** अभंग तुकाराम या चित्रपटाने तुफान यश मिळवले......

**पुरु:** हो, त्याचे श्रेय राहुल देशमुख यांना आहे. दिग्पाल लांजेकर यांच्याशी असलेल्या स्नेहसंबंधातून आपल्याला हा चित्रपट दाखवण्याची संधी मिळाली. तो ४०हून अधिक शाळा आणि मंडळांद्वारे दाखवला गेला. यात Streaming चे तंत्रज्ञान वापरल्याने तो घरी, छोट्या सभागृहात, वाचनालयातही दाखवता आला. या निमित्ताने आपल्या मुलांना महाराष्ट्रातील संतांच्या थोर परंपरेची ओळख झाली. (वृत्ताच्या जानेवारी २०२६च्या अंकात या चित्रपटाचा अहवाल छापून आला आहे).

**वृत्त समिती:** काही राहून गेले? २०२६ च्या योजना?

**पुरु:** शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम करायला खूप आवडले असते. तसेच भविष्यात कॅनडात आपले कार्यक्रम घेऊन येता यावे, यासाठी प्रयत्नशील राहू. २०२६ मध्ये उत्तर अमेरिकेतील कार्यक्रमांना प्राधान्य दिले जाईल, तसेच BMM Film Club या आपल्या उपक्रमावर भर दिला जाईल. सिऍटल येथे होणाऱ्या अधिवेशनातही उत्तमोत्तम कार्यक्रम घेऊन येण्याचा आमचा मानस आहे. त्यासाठी अधिवेशनाच्या समितीबरोबर आम्ही काम करू.

**वृत्त समिती:** तुम्ही भारतातून आणलेल्या एक से एक सरस कार्यक्रमांसाठी मन:पूर्वक आभार आणि आगामी वर्षातील कार्यक्रमांसाठी खूप खूप शुभेच्छा!



## ‘अभंग तुकाराम’ चित्रपटाचे जगभरातील मराठी शाळांमध्ये यशस्वी प्रदर्शन

संत तुकाराम महाराजांच्या जीवन, विचार आणि अभंग परंपरेवर आधारित ‘अभंग तुकाराम’ या चित्रपटाचे अमेरिका, कॅनडा आणि युरोपमधील विविध मराठी शाळांमध्ये यशस्वीपणे स्क्रिनिंग करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थी, पालक आणि मराठी समाजाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

परदेशात वाढणाऱ्या नव्या पिढीपर्यंत मराठी भाषा, संस्कृती आणि संतपरंपरा पोहोचविण्याच्या उद्देशाने मराठी शाळांच्या माध्यमातून हे विशेष स्क्रिनिंग आयोजित करण्यात आले होते. चित्रपटातून संत तुकाराम महाराजांचे अभंग, जीवनमूल्ये, भक्तीभावना आणि सामाजिक संदेश विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचले.

खालील मराठी शाळा व संस्थांमध्ये *‘अभंग तुकाराम’* चित्रपटाचे यशस्वी प्रदर्शन झाले:

**North America**: Cary, Charlotte, NC; Richmond VA; Austin, Dallas, Houston, San Antonio TX; Seattle WA; Harrisburg, Philadelphia, Pittsburgh PA; Washington DC; East Bay, Sacramento, San Diego, Los Angeles CA; Boston - MA; Minneapolis MN; Birmingham AL; Chicago WI; Indianapolis IA; Oklahoma City OK; Jacksonville, Tampa, FL; Albany NY; Phoenix AZ; Baltimore MD; Cleveland OH; North York Canada Maay Bhumi Pratishthan, TN.

**Europe**: Marathi Boli Stavanger, Trondheim Norway; Denmark; and BMM Shala Austria.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये मराठी साहित्य व संतपरंपरेविषयी आवड निर्माण झाली असून पालकांनीही या सांस्कृतिक उपक्रमाचे विशेष कौतुक केले. ‘अभंग तुकाराम’ चे स्क्रिनिंग हे केवळ चित्रपट प्रदर्शन न राहता, परदेशातील मराठी शाळांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याला नवी दिशा देणारे ठरले आहे.

या उपक्रमाच्या यशासाठी सर्व मराठी शाळा, शिक्षक, स्वयंसेवक, आयोजक संस्था आणि सहकार्य करणाऱ्या मंडळांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

## मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी संकलन अहवाल

### Marathwada Flood Relief Fundraising Report

सप्टेंबर २०२५ मध्ये मराठवाड्यात भीषण पूरस्थिती उद्भवली होती, ज्यामुळे जीवितहानीसह खूपच मोठी वित्तहानी झाली. याचा मोठा फटका मराठवाड्यातील शेतकऱ्यांना बसला.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या **“समाजरंग”** या उपक्रमांतर्गत, उत्तर अमेरिकेतील मराठी समाज आपल्या संकटग्रस्त बांधवांच्या पाठीशी उभा आहे हे दाखवण्यासाठी **“मराठवाडा पूरग्रस्त मदतनिधी”** उपक्रम सुरु केला.

सुरुवातीला बृहन्महाराष्ट्र मंडळातर्फे आम्ही मुख्यमंत्री सहायता निधी ला **₹१ लाख** देणगी जाहीर केली.

निधीसंकलनासाठी आम्ही **$२५,०००** चे लक्ष्य ठरविले होते, आणि आनंदाची गोष्ट म्हणजे आपल्या सर्वांच्या प्रेमळ आणि निःस्वार्थ योगदानातून $ ३२,६५० इतका निधी जमा झाला!

आम्ही सर्व मंडळांच्या अध्यक्षांचे, बृहन्महाराष्ट्र मंडळ प्रतिनिधींचे, तसेच सर्व देणगीदारांचे मनापासून आभार मानतो.

देणग्यांमधून जमलेली सर्व रक्कम खाली उल्लेख केलेल्या संस्थांना देण्यात आली:

| अमेरिकेतील संस्थेचे नाव | भारतामधील भागीदार संस्था | बृहन्महाराष्ट्र मंडळाने पाठविलेली देणगी ($) |
|---|---|---|
| ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन | ज्ञान प्रबोधिनी | $ १७,७५० |
| सेव्ह इंडियन फार्मर्स | मानवलोक (मराठवाडा नवनिर्माण लोकायत) | $ ५,७५० |
| सेवा इंटरनॅशनल | सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ (SPMESM) | $ ४,१०० |
| महाराष्ट्र फाउंडेशन | सामर्थ्य | $ ५,०५० |
| **एकूण** | | **$ ३२,६५०** |

(या शिवाय, लॉस अँजेलिस मंडळाने $५०० ची देणगी ‘ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन’ या संस्थेला दिली)

या सर्व संस्थांनी पूरग्रस्त भागात मदत उपक्रम सुरू केले असून, बृहन्महाराष्ट्र मंडळाला सहकार्य करण्याची तयारी दर्शवली - त्याबद्दल आम्ही या संस्थांच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे आणि स्वयंसेवकांचे मनापासून आभार मानतो.

**वर उल्लेखलेल्या संस्थांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाकडून मिळालेला निधी कसा वापरला याचा थोडक्यात वृत्तांत दिला आहे:**

**(१) ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन:** सप्टेंबर २०२५ मध्ये सोलापूर, मराठवाडा आणि आसपासच्या जिल्ह्यांमध्ये झालेल्या भीषण पुरामुळे महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांतील लोकांना गंभीर परिणामांना सामोरे जावे लागले. ऐतिहासिकदृष्ट्या दुष्काळग्रस्त असलेला हा प्रदेश एवढ्या तीव्र पुरस्थितीसाठी सज्ज नसल्यामुळे ही आपत्ती मानवी, सामाजिक आणि आर्थिक स्तरावर अत्यंत विनाशकारी ठरली.

पुरामुळे १,१०,००० हून अधिक लोक विस्थापित झाले. शेती जमीन, पिके, लघुउद्योगांची पायाभूत रचना उद्ध्वस्त झाली. हत्तूरसारखी संपूर्ण गावे काही काळ वीज, अन्न आणि संपर्काशिवाय तुटलेली होती. सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा अभाव, रस्ते व पूल वाहून जाणे आणि मानसिक ताणतणाव यामुळे परिस्थिती बिकट झाली.

या पार्श्वभूमीवर ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन (JPF) यांनी तातडीने मदतकार्य सुरू केले. मागील तीन महिन्यांत खालील प्रमुख उपक्रम यशस्वीरीत्या राबवण्यात आले:

- २१८ पूरग्रस्त कुटुंबांना मूलभूत किराणा साहित्य असलेली अन्नधान्य किट्स वितरित
- १०८ विद्यार्थ्यांना शैक्षणिक किट्स देऊन शिक्षण सुरू ठेवण्यास मदत
- ज्येष्ठ, एकट्या राहणाऱ्या, अपंग व विधवा महिलांसाठी दररोज शिजवलेल्या जेवणाचा उपक्रम, ज्यातून २० हून अधिक महिलांना आधार
- हत्तूर गावात जनरेटर बसवून तात्पुरता वीजपुरवठा सुरू; सुरक्षितता, संपर्क आणि मानसिक दिलासा

या मदतीमुळे तातडीच्या अन्न, सुरक्षितता आणि शिक्षणाच्या गरजा पूर्ण झाल्या असून, लोकांमध्ये आशा आणि विश्वास निर्माण झाला आहे.

ज्ञान प्रबोधिनीचा दृष्टिकोन केवळ तात्पुरत्या मदतीपुरता मर्यादित नसून, लोकांना सन्मानाने स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी दीर्घकालीन पुनर्बांधणीवर भर देणारा आहे.

पुढील टप्प्यात खालील क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे:

- नुकसानग्रस्त घरांची दुरुस्ती किंवा पुनर्बांधणी
- विद्यार्थ्यांसाठी दीर्घकालीन शैक्षणिक सहाय्य
- लहान व्यवसाय व उपजीविका पुनर्संचयित करणे
- शेतीसाठी अवजारे, खते व कृषी सहाय्य
- जनावरांसाठी चारा सहाय्य

बृहन्महाराष्ट्र मंडळाने मराठवाडा पूर मदत कार्यासाठी ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन (JPF) यांना **$१७,७५०** इतका निधी वितरित केला असून, **लॉस एंजेलिस मंडळाने त्यांना थेट $५०० ची देणगी दिली आहे.**

**(२) सेव्ह इंडियन फार्मर्स + मराठवाडा नवनिर्माण लोकायत:** मराठवाड्यातील पूर मदत कार्यासाठी आपण दिलेल्या निधीचा उपयोग सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील उंदरगाव गावातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी करण्यात आला आहे.

पुरामुळे लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांची नदीवर आधारित सिंचन व्यवस्था (मोटार पंप व पाईपलाईन) पूर्णपणे नष्ट झाली होती. आपल्या योगदानातून **१५ शेतकऱ्यांना प्रत्येकी ₹४०,०००** किंमतीचे कृषी विद्युत मोटार पंप व आवश्यक पाईपलाईन पुरवण्यात आली, ज्यामुळे त्यांच्या शेतात पुन्हा पाणी पोहोचले आहे.

या मदतीमुळे:

- ५०–६० एकर शेती क्षेत्राला पुन्हा सिंचन सुविधा मिळाली
- संभाव्य पीक नुकसान टळले व उत्पन्नाचा आधार सुरक्षित झाला
- पूरग्रस्त शेतकऱ्यांची तग धरण्याची क्षमता वाढली
- स्थलांतर व उपजीविका संकट टळण्यास मदत झाली

आपल्या उदार योगदानामुळे योग्य वेळी दिलेली मदत तात्पुरत्या दिलास्यापलीकडे जाऊन दीर्घकालीन परिणाम करणारी ठरली आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाने मराठवाडा पूर मदत कार्यासाठी सेव्ह इंडियन फार्मर्स यांना $ ५,७५० इतका निधी वितरित केला आहे (सेव्ह इंडियन फार्मर्स ने **MANAVLOK (Marathwada Navnirman Lokayat / मराठवाडा नवनिर्माण लोकायत)** या सामाजिक संस्थेबरोबर काम करून ह्या निधीचा वापर केला आहे).

**(३) सेवा इंटरनॅशनल + सावित्रीबाई फुले महिला एकात्मता समाज मंडळ:** मराठवाड्यातील पूरस्थितीनंतर पाणी साठवण व सिंचन संरचनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर आपण दिलेल्या निधीचा उपयोग गोलगाव, उलूप आणि वाळवड या गावांमधील बंधारा (Barrage) व संबंधित जलसंधारण संरचनांच्या दुरुस्ती व पुनर्संचयितीकरणासाठी करण्यात आला आहे.

**लाभार्थी गावांची माहिती**

- गोलगाव – लोकसंख्या सुमारे १,२००

- उलूप – लोकसंख्या सुमारे १,५००
- वाळवड – लोकसंख्या सुमारे ३,०००

**करण्यात आलेली कामे:**

**गोलगाव व उलूप:** गोलगावातील साखळी तपास धरणांपैकी एका बंधाऱ्याची तसेच उलूपमधील दोन बंधाऱ्यांची दुरुस्ती व गाळ काढण्याची (Desilting) कामे हाती घेण्यात आली. या संरचनांमुळे:

- गोलगावातील सुमारे १५ शेतकऱ्यांना थेट लाभ
- उलूप गावातील संपूर्ण गावासाठी सिंचन व जनावरांच्या पाण्याची सोय
- पुरामुळे साचलेला गाळ काढून पाणी साठवण क्षमता पुनर्संचयित करण्यात आली

**वाळवड:** वाळवड गावातील स्पिलवे संरचना ही गावाच्या पाणीपुरवठ्याच्या विहिरीशी थेट संबंधित आहे. हा दुरुस्ती खर्च जास्त असल्याने ग्रामपंचायत स्तरावर शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. या संरचनेच्या पुनर्बांधणीमुळे:

- ३,००० हून अधिक ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याचा थेट लाभ
- शेतकऱ्यांसाठी सिंचन पाण्याची उपलब्धता वाढणार
- दीर्घकालीन जलसुरक्षितता सुनिश्चित होणार

**परिणाम:**

- सिंचन व पाणी साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन
- शेती व जनावरांसाठी पाण्याची उपलब्धता वाढली
- पुरानंतरची पाणीटंचाई कमी होण्यास मदत
- शेतकऱ्यांची उपजीविका सुरक्षित होण्यास हातभार
- गावपातळीवर दीर्घकालीन जलसुरक्षिततेकडे वाटचाल

आपल्या मदतीमुळे पूरग्रस्त भागातील जलसंधारण (Water Conservation) संरचना पुन्हा कार्यान्वित करण्याचे महत्त्वाचे काम शक्य झाले आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाने मराठवाडा पूर मदत कार्यासाठी सेवा इंटरनॅशनल यांना **$ ४,१००** इतका निधी वितरित केला आहे (सेवा इंटरनॅशनल ने छत्रपती संभाजीनगर येथील सावित्रीबाई फुले महिला एकात्मता समाज मंडळ या सामाजिक संस्थेबरोबर काम करून ह्या निधीचा वापर केला आहे).

**(४) महाराष्ट्र फाउंडेशन + सामर्थ्य:** मराठवाड्यातील पूरग्रस्त भागांमध्ये सुरू असलेल्या मदतकार्याबाबत हा संक्षिप्त अहवाल सादर करण्यात येत आहे. आपण दिलेल्या निधीमुळे सामर्थ्य संस्थेला तातडीची मदत प्रभावीपणे करता आली.

**कुठे व कोणासाठी काम झाले:**

- धाराशिव (उस्मानाबाद) जिल्ह्यातील उमरगा व लोहारा तालुके
- विमुक्त व भटक्या जमाती, ऊसतोड कामगार, बांधकाम मजूर व शेतीवरील रोजंदारीवर अवलंबून कुटुंबे
- १४ वस्तीमधील १,०६७ कुटुंबांचे सविस्तर सर्वेक्षण

**मुख्य निरीक्षणे**

- ५१% कुटुंबे एकल महिला नेतृत्वाखाली
- २२% कुटुंबांमध्ये दिव्यांग व्यक्ती
- ८४.९% घरे अंशतः, तर ७.९% घरे पूर्णपणे नुकसानग्रस्त
- ८४.५% कुटुंबांनी रोजगार गमावला; सलग १५–२० दिवस काम बंद
- ८०.३% कुटुंबांकडे अपुरे अन्न, १७.६% कुटुंबांकडे अन्नसाठा शून्य

**आपल्या निधीमुळे झालेली तातडीची मदत**

- ३० गावांतील ३,००० कुटुंबांना कोरडा शिधा (Dry Ration Kits)
- प्राधान्य: एकल महिला, ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग कुटुंबे - उपासमारीचा धोका कमी झाला व तातडीचा दिलासा मिळाला

**आपल्या निधीचा उपयोग करून:**

- अंगणवाडी व प्राथमिक शाळांमधील पाणीपुरवठा लाईन दुरुस्ती
- सुरक्षित पिण्याचे पाणी व कार्यक्षम शौचालये पुनर्संचयित
- सुमारे ५० शैक्षणिक केंद्रांना थेट लाभ

**परिणाम:**

- अन्नसुरक्षा व तातडीचा दिलासा
- सर्वाधिक असुरक्षित कुटुंबांपर्यंत मदत
- मुलांचे शिक्षण, पोषण (ICDS) व आरोग्य सुधारण्याचा मार्ग
- समुदायांचा सन्मान, आशा व स्थैर्य वाढले

आपल्या सहकार्यामुळे आणि योग्य वेळी मिळालेल्या निधीमुळे अन्नसुरक्षा, शिक्षण व स्वच्छतेसारख्या मूलभूत गरजांवर ठोस काम शक्य झाले.

**बृहन्महाराष्ट्र मंडळाने** मराठवाडा पूर मदत कार्यासाठी **महाराष्ट्र फाउंडेशन** यांना **$ ५,०५०** इतका निधी वितरित केला आहे (**महाराष्ट्र फाउंडेशनने सामर्थ्य** या सामाजिक संस्थेबरोबर काम करून ह्या

निधीचा वापर केला आहे. **महाराष्ट्र फाउंडेशन** ने $१,९५० अधिक भर घालून **सामर्थ्यची** $७,००० इतक्या निधीची मागणी पूर्ण केली).

**या सर्व संस्थांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाचे, तसेच उत्तर अमेरिकेतील सर्व मराठी मंडळे, आणि वैयक्तिक देणगीदारांचे आभार मानले आहेत.**

आपल्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल पुन्हा एकदा तुम्हा सर्वांचे मनःपूर्वक धन्यवाद!

आपला,

- **प्रसाद पानवळकर,** अध्यक्ष, बृहन्महाराष्ट्र मंडळ

## शिवछत्रपती अभ्यास वर्ग



**“छत्रपती शिवाजी महाराज की जय!”** छत्रपती शिवाजी महाराज हे सर्व मराठी माणसांचे दैवत आहेत. त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करून केवळ महाराष्ट्र राज्यच नव्हे, तर संपूर्ण भारत देशाच्या इतिहासाचीच दिशा बदलली.

शिवाजी महाराजांविषयी तुम्हाला अधिक जाणून घेता यावे, तसेच आपले पूर्वज कोण होते आणि त्यांनी कोणते पराक्रम केले हे समजावे, या उद्देशाने बृहन्महाराष्ट्र मंडळाची मराठी शाळा, तुमच्यासाठी एक नवा आणि रंजक उपक्रम घेऊन आली आहे: **शिवछत्रपती अभ्यास वर्ग!**

या उपक्रमामध्ये शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांवर आधारित प्रश्नमंजुषा (Questionnaire) तयार करण्यात आली आहे. यात २०० होऊन अधिक प्रश्न आहेत. त्याचबरोबर बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या संकेतस्थळावर तुमच्यासाठी सोडवता येईल अशी सोपी बहुपर्यायी प्रश्नावली (Multiple Choice Questions) देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसोबत शिवाजी महाराजांविषयी अभ्यास करून **बृहन्महाराष्ट्र मंडळाची “शिवछत्रपती अभ्यास वर्ग” परीक्षा उत्तीर्ण होऊन प्रमाणपत्र मिळवावे** ही आमची अपेक्षा आहे. शिवप्रेमी पालक सुद्धा ही परीक्षा देऊ शकतात.

या विषयी अधिक माहिती मिळवण्यासाठी बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या शाळेच्या संकेतस्थळाला भेट द्या: bmmonline.org/marathishala/ (then click on “History of the Might Marathas”)

## मकर संक्रांती आणि सूर्यदेव

भारतीय परंपरा सणांनी आणि रूढींनी ओतप्रोत भरलेली आहे. मकर संक्रांती हा त्यातलाच एक सण आहे. याच दिवशी संक्रांतीदेवीने संकारसूर नावाच्या राक्षसाचा वध केला आणि लोकांना त्याच्या त्रासातून वाचवले. त्यादिवशी सूर्य मकर राशीत होता म्हणून त्या दिवसाला मकर संक्रांती असे नाव पडले.

मकर संक्रांती हा सण सूर्यदेवाच्या पूजेसाठी समर्पित केला आहे. या दिवशी सूर्यदेव भ्रमण मार्ग बदलून धनू राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. हया संक्रमणाला अत्यंत शुभ मानले गेले आहे. तसेच हा दिवस भगवान सूर्याच्या उत्तरायण प्रवासाचा उत्सव म्हणता येईल. म्हणजेच सूर्य उत्तर दिशेकडे प्रवास सुरू करतो. तो प्रकाश, ज्ञान आणि नवचैतन्याच्या आरंभाचे प्रतीक आहे. या निमित्ताने मकर संक्रांतीला सूर्यदेव आणि मनुष्य यांच्यातील विशेष व पवित्र नाते साजरे केले जाते.

सूर्यदेवाचा रथ त्याच्या अफाट उर्जेचे आणि गतीचे प्रतीक आहे. तो सात घोड्यांनी ओढला जातो. ह्या सात घोड्यांची नावे गायत्री, बृहती, उष्णि, जगती, त्रिष्टुभ, अनुष्टुभ आणि पंक्ति अशी आहेत. हे घोडे प्रकाशाचे सात रंग, आठवड्याचे सात दिवस आणि मानवी शरीरातील सात चक्रे अशा विविध प्रतीकांचे प्रतिनिधित्व करतात.

मकरसंक्रांती आणि सूर्यदेव यांचा संबंध फक्त खगोलीय किंवा सांस्कृतिक नाही तर तो वैदिक परंपरेत खोलवर रुजलेला आहे. वैदिक काळापासून भगवान सूर्याच्या उपासनेचा उल्लेख आहे. ऋग्वेदात सूर्याला अचल आत्मा म्हटले आहे. तसेच वैदिक काळापासून ते आतापर्यंत सूर्याला जीवन, आरोग्य आणि शक्तीची देवता म्हणून ओळखले गेले आहे.

खगोलीय दृष्टिकोनातून सूर्य म्हणजे नऊ ग्रहांपैकी एकमात्र तारा सूर्य आहे. पण त्यातल्या सूर्यालाच फक्त अर्घ्य देतात. अर्घ्य म्हणजे सूर्यादयाच्या वेळी तांब्याच्या भांड्यात पाणी घेऊन पूर्वेकडे तोंड करून उगवत्या सूर्याला जल समर्पित केले जाते. यामुळे व्यक्ती उर्जावान होते असे मानले आहे.

**अर्घ्य देताना म्हणावयाचा मंत्र :**

एहि सूर्य। सहस्त्रांशो तेजो राशे । जगत्पते । अनुकम्प्यं मां भक्त्या गृहाणार्घ्य दिवाकर।

**अर्थ:** हे सूर्य देवता, तुझ्यासारखे तेज आम्हाला दे आणि आमच्यावर तुझी कृपादृष्टी कायम असू दे.

मकर संक्रातीला भारतातल्या वेगवेगळ्या प्रातांत विविध नावाने संबोधिले जाते. पंजाबमध्ये लोहडी, आसाममध्ये भोगाली बिहू, काश्मिर मध्ये शिशिर संक्रांत्र, उत्तर भारतात खिचडी संक्रांत, बंगालमध्ये तिळुजा संक्रांती, गुजराथमध्ये उत्तरायण या नावाने सण साजरा केला जातो. तसेच तामीळनाडूत यानिमित्त तीन दिवस चालणारा पोंगल असतो. पहिल्या दिवशी इंद्राप्रीत्यर्थ इंद्र पोंगल, दुसऱ्या दिवशी सूर्याप्रीत्यर्थ सूर्य पोंगल, तिसऱ्या दिवशी गायीसाठी मट्ट पोंगल साजरा केला जातो. त्याच बरोबर जलीकट्टू हा प्रसिद्ध खेळ या दरम्यान खेळला जातो.

महाराष्ट्रात हा सण भोगी, संक्रांत, क्रिंकांत असा तीन दिवस साजरा केला जातो.

संक्रांती हा शब्द संक्रम या पहिल्या गणातील उभयपद धातू1 पासून तयार झाला आहे. प्रवेश करणे, ओलांडून जाणे, पुढे नेणे अश्या अनेक अर्थांनी हे क्रियापद वापरले जाते.

धार्मिकदृष्ट्या सूर्याचे एका राशीतून दुसऱ्यात जाणे म्हणजे संक्रांती होय.

बारा राशींमधल्या सूर्याच्या संक्रमणाला त्या राशीची संक्रांती असे म्हणतात.

**मेषादिषु द्वादशराशिषु क्रमेण संचरतः सूर्यस्य।**
**पूर्वस्माद्राशेरुत्तर राशौ संक्रमणं प्रवेश: संक्रान्ति ।**
**अतस्तद्राशिनाम पुरः सरं सा संक्रान्ति र्व्यपदिश्यते।**
*(कालनिर्णय पृष्ठ ३३१)* [१]

प्रत्येक संक्रांती पवित्र दिवस म्हणून गणला जातो.

**खे: संक्रमणं राशौ संक्रान्तिरिति कथ्यते।**
**स्नानदान तपः श्राद्धहोमादिषु महाफला ॥**
*(नागरखंड- हेमाद्रि काल, पृष्ठ-४१०)* [२]

सूर्य देवतेची मंदिरे भारतात विविध प्रांतात आहेत. ओरिसातील कोणार्क, गुजराथमधील मोढेरा, उत्तरखंडातल्या अल्मोडातले कटारमल सूर्य मंदिर, झालावाड राजस्थान येथील मंदिरे प्रसिद्ध आहेत. कलिंग शैलीतील १३व्या शतकातले कोणार्कचे सूर्यमंदिर सूर्य देवाच्या भव्य रथासारखे बांधलेले असून त्याला १२ विशाल दगडी चाके व ७ घोडे कोरलेले आहेत. मारू-गुर्जर शैलीतले ११व्या शतकातले मोढेरा सूर्य मंदिर सोलंकी राजवंशातील राजा पहिला भीमसेन याने स्थापन केले. मंदिरासमोरील भव्य सूर्यकुंड हे या मंदिराचे सर्वात आकर्षक वैशिष्ट्य असून त्याच्या पायऱ्यांवर शंभराहून आधिक लहान मंदिरांची रचना केलेली आहे. गर्भगृहाचे दिशानियोजन असे केले गेले होते की सूर्याचे पहिले किरण देवतावर पडतात. उत्तराखंडातील अल्मोडाच्या शांत नैसर्गिक परिसरातले उंच टेकड्यावर वसलेले सूर्य मंदिर आजही अत्यंत शांत आणि रमणीय वातावरणात आहे. पर्वतीय नागर शैलीतील हे मंदिर अंदाजे ८-९व्या शतकात कत्युरी राजांनी बांधलेले आहे. या ही मंदिराच्या दिशानियोजनामुळे सूर्याचे पहिले किरण देवतावर पडतात. झालावाड, राजस्थान इथले सूर्यमंदिर गुर्जर-प्रतिहार / परमार स्थापत्यशैलीचा उत्तम नमुना आहे. मध्यप्रदेशातील खरगोन जिल्हातल्या कुंदा नदीच्या काठावर वसलेल्या श्री नवग्रह मंदिरात मकर संक्रांतीला सूर्याचे पहिले किरण भगवान सूर्य नारायणावर पडतात, त्यामुळे मकर संक्रातीच्या दिवशी श्री नवग्रह मंदिराच्या दर्शनाला विशेष महत्व आहे.

अशा ह्या सूर्य देवतेला समर्पित सूर्यअष्टकम स्तोत्र तिच्या विविध रूपांची व शक्तींची स्तुती करते. या स्तोत्राच्या पठणाने आरोग्य, ऊर्जा आणि सकारात्मकता वाढते तसेच जीवनातील अडचणी दूर होतात. या स्तोत्रात आदिदेव, प्रभाकर, दिवाकर अशा सूर्याच्या विविध नावांचा उल्लेख आढळतो.

सूर्य अष्टकम् स्तोस्त्रातले पहिले दोन श्लोक -

**आदिदेव नमस्तुभ्यं प्रसीद मम भास्कर।**
**दिवाकर नमस्तुभ्यं प्रभाकर नमोऽस्तु ते॥**
**सप्ताश्व रथमारूढं प्रचंड कश्यपात्मजमू**
**श्वेतपद्मधरं देवं तं सूर्य प्रणमाम्यहम्॥**

**अर्थ:** हे आदिदेवा भास्करा, तुला मी नमन करतो. सात घोड्यांच्या रथावर आरुढ झालेल्या प्रचंड तेजस्वी कश्यपकुमार सूर्याला प्रणाम.

अशा रितीने मकर संक्रांती आणि सूर्यदेव यांच्यामधले नाते हे भारतीय संस्कृतीतील आध्यात्मिक आणि वैज्ञानिक विचारांचे सुंदर मिश्रण आहे.

**म** कर राशीतला
**क** श्यपकुमार
**र** मणीय
**सं** क्रमणीय
**क्रां** तीशील
**ती** ळगुळाच्या गोडव्याचा ।।

- **उत्तरा भालेराव,** टॅम्पा, फ्लोरिडा

*[१] उदाहरणार्थ, नम् (नमस्कार करणे) हा धातू पहिल्या गणातील आहे आणि तो उभयपद आहे.*
*परस्मैपद: अहं देव्य नमामि (मी देवतेला नमस्कार करतो)*

*आत्मनेपद: अहं देव्य नमे (मी देवतेला नमस्कार करतो)*
*यामुळे, पहिल्या गणातील उभयपद धातू असे आहेत जे परस्मैपद आणि आत्मनेपद या दोन्ही प्रकारे वापरले जाऊ शकतात आणि ते पहिल्या गटात येतात.*

*[२] "नागरखंड" हेमाद्रि द्वारा संकलित एक धर्मग्रंथ आहे, जो 'कालनिर्णय' चा भाग आहे. ज्योतिष विषयासंबंधित हा ग्रंथ आहे. प्रामुख्याने सूर्याच्या राशि परिवर्तनाच्या वेळा आणि त्याचे परिणाम याचे वर्णन केले आहे.*




## थेंब....

थेंब थेंब सांडले
शुभ्र ह्या फुलांवर
जणू उधळले मोती
पावसाने त्यांच्यावर....

थेंबांचा स्पर्श
थेंबांचा शिडकावा
हळुवार अलवार
दिला त्यांना थंडावा....

पावसाचे थेंब
फुलांच्या पाकळ्या
ऋतू पावसाळी
मैत्र वाटा खुलल्या....

हा नजारा सुरेख
सुंदर ही भेट
फुलं आणि थेंब
असे भिडले हे थेट....

**- अंकिता कार्ले**, हार्टफोर्ड, कनेक्टिकट

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## उत्तररंग




BMM उत्तररंगाच्या Father's Day निमित्ताने सादर झालेल्या "लई अवघड हाय गड्या उमगाया बाप रे" या विशेष कार्येक्रमात काही उत्तररंगीयानी आपल्या वडिलांच्या आठवणी सादर केल्या. त्यातीलच काही आठवणी येत्या काही महिन्यात वृत्तात प्रसिद्ध करण्यात येतील.

### माझे प्रेरणास्त्रोत

नमस्कार, मी प्रेरणा. अशी जर माझी ओळख करून दिली तर तुम्ही म्हणाल, "अगं, पूर्ण नाव सांग." मी प्रेरणा प्रकाश पारखी. तीर्थरूपांच आणि घराण्याचं नाव लावल्याशिवाय आपली ओळख पूर्ण होत नाही.

दरवर्षी स्नेहसंमेलनाला किंवा बालदिनाला आमच्या शाळेत आमच्या तीर्थरूपांना मुलांसाठी कार्यक्रम करायचं आमंत्रण असायचं. त्यामुळे पारखींची मुलगी म्हणून मला सगळे ओळखत. बालनाट्य आणि नाट्यसंस्कार म्हटलं की प्रकाश पारखी हे समीकरण सर्वज्ञात आहे. जगाच्या पाठीवर आम्ही कुठेही गेलो तरी "अहो पारखी सर माझी मुलगी" किंवा "माझा भाचा तुमच्या नाट्य शिबिराला यायचा" अशी आठवण सांगणारे कायम भेटतात.

लहान असताना आई जॉब करायची त्यामुळे माझी रवानगी बाबांबरोबर प्रत्येक ठिकाणी जिथे जिथे ते नाट्यशिबिर घेत तिथे होत असे. आई कामावर आणि बाबा इतर मुलांच्या गराड्यात. मी पारखी सरांची मुलगी म्हणून फेमस असले तरी शिबिरात काही स्पेशल ट्रीटमेंट मिळायची नाही मला. पण सगळ्यांबरोबर नाट्यखेळ खेळण्यात खूप धमाल यायची. तेव्हाच नकळत माझ्यावर नाट्य-संस्कार होत गेले. स्टेजवर काम करताना टाळ्या आणि कौतुकाची थाप पाठीवर मिळाल्यावर नवीन रोल्स करत राहण्याची चटक लागली. बाबांसारख आपलही कपाट अवॉर्ड्सनी भरून जावं असं वाटू लागलं. मी या क्षेत्रात काम मिळवण्याची धडपड करू लागले. अभिनयाला नृत्याचं जोड पण होती.

पण माझी मुलगी म्हणून हिला घ्या अशी बाबांनी कुठल्याही नाट्यसंस्थेकडे किंवा दिग्दर्शकाकडे माझी शिफारस केली नाही. आमच्या बरोबर ते फार कमी असतात. कायम नवीन उपक्रम

राबवण्यात, नाट्यशिबिरात किंवा नाटकांच्या प्रयोगामध्ये ते रमलेले असतात. लहानपणी राग यायचा पण जसजसे मी या क्षेत्रात काम करत गेले आणि त्यांच्या कामाला वाहून घेण्याच्या वृत्तीचे , सातत्याने चिकाटीने काम करत राहण्याच्या त्यांच्या जिद्दीचे इतरांकडून कौतुक ऐकायला मिळाल्यावर तिकीट न काढताच बंपर लॉटरी लागल्याची जाणीव मला झाली.

प्रसिद्धी, पैसे, ग्लॅमर यावर फोकस न करता, सरकारी अनुदानाची वाट न पाहता त्यांनी मुलांच्या पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटसाठी नाट्य प्रशिक्षणाची चळवळ ५० वर्षांहून अधिक काळ चालवली. हिंदुस्तान अँटिबायोटिक्स कंपनीमध्ये ३ शिफ्टमध्ये काम करून कुठल्याही सबबी न सांगता नाट्यसेवेचा हा वसा ते निरंतर जपत आहेत.

खेडोपाडी जिथे नाटक काय आहे हे माहित नाही तिथे जाऊन त्यांना नाटक करून दाखवणे, शाळेत मुलांना आणि शिक्षकांना अभ्यासनाट्याची गोडी लावणे, नाट्यछटा स्पर्धा, नाट्यस्पर्धा, त्यासाठी बुक पब्लिकेशन असे अनेक उपक्रम आज पंचाहत्तरी गाठली तरी ते सातत्याने राबवत आहेत. या टप्प्यावर पोहोचूनही आता थांबायचं नाही असंच ते कायम म्हणतात.

या वाटचालीत अनेकांनी त्यांना भरभरून प्रेम दिलं, साथ दिली तसंच काहींनी अडथळा आणण्याचाही प्रयत्न केला. पण नेहमी आपलं काम प्रामाणिकपणे आणि निरपेक्ष केलं की चांगल्या कामाचं फळ चांगलंच मिळतं हे त्यांनी त्यांच्या वागण्यातून आणि कृतीतून आमच्या मनात रुजवलं. त्यामुळेच अनेक नामांकित पुरस्कारांनी त्यांच्या या कामाचा गौरव झाला.

त्यांनी केलेली पाककृती असो वा कलाकृती, दोन्हीही रसिकांचं मन जिंकणारंच. लेखक, दिग्दर्शक, संस्थापक, गिर्यारोहक, नकलाकार, नाट्यपरिषदेचे अध्यक्ष, उत्तम कुक अशा अनेक भूमिका लिलया पार पाडणारे माझे बाबा प्रकाश विनायक पारखी.

- **प्रेरणा पारखी**, ॲरिझोना, फिनिक्स

## बाप म्हणजे काय असतं?

मी ४-५ वर्षांची चुटचुटीत मुलगी होते. कुणाकडे गेलं की लहान मुलांना विचारतात तसा नेहमीचा प्रश्न असायचा “तुझं नाव काय? “ “ आईचं नाव काय?” मग यायचा प्रश्न, “तुला, जास्त कोण आवडतं आई का बाबा?” तेव्हा माझे ठाम non-political उत्तर असायचं “बाबा”. मग लगेच थोडास मला अडचणीत टाकावं म्हणून पुढचा प्रश्न “ आणि, तू कुणाची लाडकी आहेस?” पण थोडंही न थांबता मी लाडक्या आवाजात म्हणणार “बाबांची”. ही माझी उत्तरे पुढे कितीही मोठी झाले तरी कायम राहिली.

गोष्टीत असतं तसं आमचं एक चौकोनी कुटुंब होतं. आई, बाबा आणि आम्ही दोन मुलं, एक मुलगी आणि एक मुलगा. आमची आई घरी असल्यामुळे आम्हा दोन्ही मुलांना शिस्त लावणे, पाढे -श्लोक पाठांतर करून घेणे, शाळेचा अभ्यास, क्लास व्यायाम ह्या सगळ्या माझ्या नावडत्या गोष्टी तिच्या खात्यात होत्या तर आमच्या नातेवाइकांना ‘जरा जास्तच’ असे वाटणारे लाड करायचे काम बाबांचे, अशी कामाची विभागणी झाली होती.

माझे बाबा म्हटले की मला आठवतो तो त्यांचा गोरा पान रंग, घारे पण मृदू डोळे, फडके घराण्याचे पेटंट भव्य कपाळ आणि सडपातळ बांधा. घरी असले की पांढरा स्वच्छ झब्बा लेंगा आणि ऑफिसला जाताना फुलशर्ट, पॅन्ट आणि टाय. पुढे कधीतरी टाय मागे पडला. बाकी काही वर्षानुवर्षे बदल नाही.

आई आणि बाबा दोघेही जे. जे. स्कूल ऑफ आर्टच्या फाईन आर्टचे ग्रॅजुएट होते. पण आई घरकामात अडकली आणि बाबा advertizing कंपनी मध्ये आर्टिस्ट म्हणून लागले आणि सहज आपल्या तरल बुद्धिमतेच्या जोरावर vice president पदाला जाऊन पोहोचले. मोठ्या पदावर फारशी मराठी माणसं नसलेल्या त्या क्षेत्रात त्यांनी चांगलं नाव मिळवलं होतं पण ते प्रसिद्धी आणि बडेजावापासून कायमच पाठ फिरवून होते. Advertising क्षेत्रातील लखलखत्या glamorous वातावरणच त्यांना अजिबात आकर्षण वाटलं नाही. कुठल्याश्या पंचतारांकित हॉटेल मधल्या पार्टी नंतर घरी येऊन, वाट बघणाऱ्या आईनी केलेला, दूध भात जेवायला जेव्हा ते बसत तेव्हा आम्ही मुलं आश्चर्याने बघत रहायचो.

बाबांना लहान मुलांची अतिशय आवड होती. बाबांसारखं मुलांमध्ये मूल होऊन जायला मला कधीच जमलं नाही. माझ्या आठवणीत, बागेत आम्हाला विमान किंवा फुलपाखरू बनवून ते आमच्याशी खेळत आहेत किंवा माझ्या भातुकलीचा खोटा खोटा स्वयंपाक त्यांना खायला घालायला धडपडणारी मी आणि “अरे वा काय मस्त झालंय” म्हणत चट्टामट्टा करणारे बाबा अशी दृश्ये आहेत. शनिवारी बाबांना अर्धा दिवस सुट्टी असायची मग आम्हा दोन्ही मुलांना छानसे कपडे घालून आई आम्हाला चर्चगेटला बाबांना भेटायला घेऊन जायची. तिथल्या बॅण्डस्टॅण्डवर घोड्यावर बसून, बागेत खेळून किंवा जहांगीर आर्ट गॅलरीत एखादे प्रदर्शन बघून मग एखाद्या रेस्टॉरंटमध्ये जेऊन आम्ही घरी परतायचो ते बाबांच्या खांद्यावर मान टाकूनच.

आर्टिस्ट असलेल्या माझ्या आई बाबांनी घर फार छान ठेवले होते. कुठेही फारसा खर्च न करता ते गोष्टी सुंदर करून टाकायचे.

आईने बागेत लावलेल्या फुलांपैकी काही फुलं घरात आणून बाबा छानपैकी flower arrangement करायचे. बाबा माणूसघाणे नव्हते पण introvert आणि स्वप्नाळू होते. त्यांना घरी येणारे असे मित्र नव्हतेच. ते घरी असले की पुस्तक वाचत किंवा स्केचिंग करत बसायचे. आई आणि आम्ही मुलं त्यांच्या अवती भोवती असायचो. मग नुकताच बघितलेला सिनेमा, नाटक, TV, पुस्तक, गाणी ह्यांवर चर्चा व्हायच्या. मग जया भादुरीने गाण्याच्या शेवट कळशी कशी हलवली, नूतन स्विस बोर्डिंग स्कूलमध्ये शिकून आली असली तरी गावातल्या बाईच काम कसं छान करते, भाषण करायचे असेल तर ते आधी टेप करून आपणच कसं ऐकायचं वगैरे बाबांची टिप्पणी मी भक्तासारखी ऐकत असायचे. माझ्या अमेरिकेतल्या घरी आले की बाबा पेंटिंग करण्यात वेळ घालावयाचे. त्यांच्याबरोबर जाऊन पेंटिंगसाठी साहित्य घेऊन येणे आणि त्यांच्याबरोबर Museums परत परत पालथी घालणे हे माझ्या आयुष्यातील सोनेरी क्षण आहेत.

माझ्या बाबांचं नाव रविकांत नारायण फडके. त्यातलं 'नारायण' हे त्यांच्या वडिलांचं नाव. जे सर्वांना नारायण सीताराम फडके किंवा ना. सी. फडके ह्या नावाने माहीत आहेत. बाबा आपल्या वडिलांना अप्पा म्हणायचे. पण बाबा कोवळ्या १०-११ वर्षांचे असताना अप्पांनी दुसरे लग्न केले आणि ते माझी आजी आणि आपली पाच मुलं घरी सोडून गेले. ह्या घटनेचा बाबांवर फार मोठा परिणाम झाला होता. आमच्या घरी हा विषय पूर्णपणे बाद होता. बरचसं मोठं होईपर्यंत मला माझ्या आजोबांबद्दल माहीत नव्हतं. बाबा क्वचित कोल्हापूरच्या त्यांच्या घराच्या आठवणी सांगायचे. त्यांनी ना. सी. फडक्यांशी पूर्ण संपर्क सोडला होता पण त्याचबरोबर त्यांनी अप्पांविषयी एकही वाईट शब्द कधीही उचारला नाही. हे वडिलांनी केलेल्या परित्यागाचे दुःख ते आयुष्यभर अश्वथाम्याच्या जखमेसारखं आपल्या मनातच ठेऊन होते. आयुष्याच्या सुरवातीसारखंच बाबांच्या शेवटच्या काही वर्षात एका मागून एक अशी अनेक दुःख त्यांनी तशीच मुकाट्याने सहन केली. आपल्या दोन्ही लाडक्या मुलांच्या आयुष्याची झालेली होरपळ, माझ्या आईचा दीर्घ काळ चाललेला dementia सारखा आजार ह्या सगळ्या परिस्थितीला न बोलता सामोरे गेले.

बाबांच्या शेवटच्या काही महिन्यात मी पुण्यात होते. त्यांनी मला ना. सी. फडक्यांच्या "दौलत" ह्या घरी जायला सांगितले. तिथे काही अप्पांचे स्मारक किंवा लायब्ररी आहे का त्याची चौकशी करायला. मी गेले तर ना. सी . च्या वारसांनी केटरिंग कंपनी काढून तिथे लग्नाचं कार्यालय काढल्याचं मला दिसलं. ते ऐकून माझ्या बाबांना फार वाईट वाटलं. त्यांच्याकडे अप्पांची बरीच पत्रं होती ती आपल्या प्रसिद्ध वडिलांच्या संग्रहात सामील करायचा त्यांचा विचार होता. आयुष्यभर नाही पण मरणानंतरही वडिलांच्या जीवनात आपल्याला जागा नाही हे पाहून त्यांचे डोळे थोडे पाणावले होते आणि "चला आता तो विषय संपला" असं म्हणून त्यांनी ती पत्रं नष्ट केली.

पण बाबा, त्या क्षणी मी तुमच्याशी जे मी बोलले नाही ते आज सांगते. तुम्हाला जे पितृसुख मिळाले नाही ते तुम्ही आम्हाला अनेक पटीने दिलेत. मुलांचा बाप होणे म्हणजे काय हे जे तुम्हाला उमजलं ते त्या प्रसिद्ध लेखकाला नाही.

- **डॉ. मेधा गोडबोले,** क्लीव्हलंड, ओहायो

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

घटिकांमागून घटिका पळती
लंबक हलतो काळाचा
बघता बघता वर्ष सरे अन्
दिन ये नवीन सालाचा
पुन्हा घडी ती, हिशोब करिसी
पडताळुनी अपुली खाती
किती जमा वा खर्च जाहले
वेळ, संपदा अन् कीर्ती
कधी असाही विचार कर ना
आण घालूनी हृदयाला
कधी कुणास्तव अश्रू ढाळले?
कधी हसविले कोणाला?
नकोच नुसती वर्षे मोजूस
आली किती नि गेली किती
जीव कुणास्तव हुरहुरला का
सहज कधी जडली प्रीती
पुटेच नुसती आयुष्यावर
महिन्यांची तू चढवू नको
तुझ्या अंतरी करुणा वाहे
झऱ्यास त्या तू रोखू नको
अळवावरचे पाणी जीवन
ओघळेल ते भुईवरी
समेटून तू हाती धरिता
लखलखेल बघ हिऱ्यापरी
नवीन वर्षाच्या शुभेच्छा!

- **अनिता म. कांत,** सान रमोन, कॅलिफोर्निया

## दिवाळी किल्ला स्पर्धा

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मराठी शाळा या उपक्रमांतर्गत दर वर्षीप्रमाणे किल्ला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.  सहावे वर्ष होते. एकूण ६९ शाळांनी स्पर्धेत भाग घेतला होता. परीक्षक म्हणून **श्री. पराग कानविंदे** यांनी काम पाहिले. या स्पर्धेतील विजेते:









Albany Maharashtra Mandal’s Marathi Shala









## अभ्यासाव्यतिरिक्त गवसलेली ओळख

१६ ते २६ वयोगटातल्या उत्तर अमेरिकेतील युवांच्या अभ्यासाबाहेरील कौशल्यांवर प्रकाशझोत टाकण्याची आमची इच्छा आहे. या आगामी सदरात उत्तर अमेरिकेतील तरुणाईचे कला, खेळ, समाजसेवा, संगीत-नृत्य यांसारख्या क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य प्रकाशित करण्याचा प्रकल्प आम्ही सुरु करीत आहोत. या उपक्रमात युवक-युवतींची वैयक्तिक माहिती, त्यांची आवड, प्रेरणा, कामगिरी, उपलब्धी, सामाजिक प्रभाव आणि भविष्याची दिशा जाणून घेण्यासाठी एक संपूर्ण प्रश्नावली तयार केली आहे.

वय वर्षे १८ च्या वरील तरुणांनो व १८ हुन लहान असलेल्या मुलांच्या पालकांनो - तुम्हाला किंवा तुमच्या मुलांना ह्या प्रकल्पात सामील व्हायचे असेल तर खालील फॉर्म भरावा.

https://forms.gle/tf1ETWQQBQEfH9hT9

आमच्या आगाऊ पाठवलेल्या प्रश्नावलीच्या आधारावर घेतलेली तुमची मुलाखत वृत्तात प्रकाशित केली जाईल. इतरांना देखील प्रोत्साहन मिळेल!! हिवाळ्याच्या सुट्टीचा लाभ घेऊन त्वरित संपर्क साधा, आम्ही वाट बघतोय!!



### दण्डक्रमविक्रमादित्य वेदमूर्ति श्री. देवव्रत महेश रेखे गौरव समारंभ

**Sunday, January 4, at 9PM EST/6PM PST**

**YouTube Live Stream:** https://www.youtube.com/live/D_cMl-JYwZA

## तुमचा उत्कर्ष तुमच्या हातात

प्रत्येक माणसाला असे वाटत असते की मला जीवनात सुखसोयी प्राप्त व्हाव्या, मानसिक स्वास्थ, उत्तम आरोग्य लाभावे आणि माझी उन्नती व्हावी. त्यासाठी प्रत्येकजण आपापल्या परिने प्रयत्न देखील करीत असतो. सुखसोयी मिळविण्यासाठी माणूस भरपूर पैसा कमविण्याच्या मागे लागतो, मानसिक शांततेसाठी मेडिटेशन करतो, शरीरासाठी भरपूर व्यायाम करतो, देवधर्मासाठी व्रतवैकल्ये करतो. काही लोक श्रीमंत असतात पण त्यांच्याकडे मानसिक शांतता नसते. काही लोक आजारपणामुळे त्रस्त असतात. व्रतवैकल्य आणि पूजापाठ करुनही घरात शांतता नसते. सहाजिकच एवढे करुनही माणसाला सुखशांती मिळतेच असे नाही. मग जीवनात सर्वार्थाने आणि सर्वांगाने प्रगती साधण्यासाठी माणसाने नेमके काय करायला हवे? अशी कोणती गोष्ट आहे ज्यामुळे सुखसोयी आणि मानसिक शांतता दोन्ही प्राप्त होईल. जीवनविद्या तत्त्वज्ञानानुसार जीवनात सर्व काही प्राप्त करण्याचा ‘विश्वप्रार्थना’ हा एक रामबाण उपाय आहे. विश्वप्रार्थना म्हटल्याने माणसाची भौतिक, मानसिक, शारीरिक आणि अध्यात्मिक अशी सर्वांगाने प्रगती होऊ शकते. मागील लेखात आपण ‘विश्वशांतीसाठी विश्वप्रार्थना’ हा विषय जाणून घेतला होता. त्यानुसार विश्वप्रार्थनेने वैचारिक प्रदूषण कसे कमी होते, शुभचिंतन कसे घडते हे पाहिले. आता या लेखात आपण विश्वप्रार्थनेने वैयक्तिक प्रगती कशी साधायची ते पाहणार आहोत. प्रगती म्हणजे उत्कर्ष (Material Progress) आणि उन्नती (Psychospiritual Progress).

**विश्वप्रार्थना**

**"हे ईश्वरा,**
**सर्वांना चांगली बुध्दी दे,आरोग्य दे,**
**सर्वांना सुखात आनंदात ऐश्वर्यात ठेव,**
**सर्वांचं भलं कर,कल्याण कर,रक्षण कर,**
**आणि तुझे गोड नाम मुखात अखंड राहू दे.”**
**- सदगुरु श्री वामनराव पै.**

विश्वप्रार्थनेतील प्रत्येक शब्द हा सकारात्मक आणि व्यापक विचार आहे. ‘विचार तसा जीवनाला आकार’ हा निसर्गाचा नियम असल्याने तुम्ही जसा विचार करता तसे तुमचे जीवन घडते. आपण जे विचार सतत करतो ते विचार बर्हिमनातून अंर्तमनात जातात आणि जीवनात साकार होतात. आपले अंर्तमन एवढे शक्तीशाली आहे की तुम्ही जो विचार करता त्या विचारांना ते प्रत्यक्षात आकाराला आणू शकते. जेव्हा तुम्ही ही विश्वप्रार्थना मनापासून आणि सातत्याने म्हणता तेव्हा या प्रार्थनेतील शब्द आणि कालांतराने त्यामागील भावना तुमच्या अंर्तमनात जातात. विश्वप्रार्थनेमुळे तुम्हाला नियमित चांगले आणि मोठे विचार करण्याची सवय लागते. ज्यामुळे प्रार्थनेत असलेली चांगली बुद्धी, आरोग्य, सुख, आनंद, ऐश्वर्य, भले, कल्याण, रक्षण या सर्व चांगल्या गोष्टी हळू हळू तुमच्या जीवनात येऊ लागतात.

आता कदाचित तुमच्या मनात असा प्रश्न निर्माण होईल की “आम्ही आजवर अनेक मोठे आणि चांगले विचार केलेले आहेत. पण आमचे सर्वच विचार जीवनात साकार झाले नाहीत. मग विश्वप्रार्थनेतील विचारांमध्ये असे काय वेगळे आहे ज्यामुळे आमची सहज प्रगती होईल?” वास्तविक प्रत्येक माणसाला आयुष्यात सर्वकाही चांगलेच हवे असते. कोणालाही जीवनात दुःख, अपयश किंवा दारिद्र्य नको असते. त्यामुळे माणूस स्वतःसाठी चांगल्याच इच्छा करतो. आपल्या इच्छा सत्यात उतरविण्यासाठी भरपूर प्रयत्नही करतो. पण तरीही बऱ्याचदा माणसाच्या वाट्याला दुःख आणि अपयश येते. याला कारण त्याच्या मनात येणाऱ्या शंकाकुशंका असतात. चांगल्या इच्छा आणि विचारांसोबत बर्हिमनात शंकाकुशंकाचा खूप गोंधळ (Noice) सुरु असतो. चिंताकाळजीने मनाला ग्रासलेले असते. बर्हिमनातील या गोंधळामुळे चांगले विचार अंर्तमनापर्यंत पोहचत नाही. मनात निर्माण होणारे चिंता-काळजीचे विचार अंर्तमनाला चांगले विचार स्वीकारण्यास अडथळा निर्माण करतात. तुम्ही जे विचार सतत करता त्यानुसार तुमच्या अंर्तमनाचा एक विशिष्ट पॅटर्न तयार होत असतो. बर्हिमनात सतत नकारात्मक विचार केल्याने अंर्तमनाचा पॅटर्नही नकारात्मक होतो. त्यामुळे बऱ्याचदा तुमचे चांगले विचार आणि इच्छा तुमच्या अंर्तमनाच्या पॅटर्नशी विसंगत होतात.

समजा तुम्हाला मोठे घर खरेदी करायचे आहे. त्यानुसार तुम्ही एखादे आलिशान घर घेण्याचे ठरवता. पण पूर्वानुभव चांगला नसेल तर अंर्तमनाला हा विचार लगेच पटकन पटत नाही. तुमचे मन परिस्थितीनुसार विचार करु लागते. आतापर्यंत आपण मोठे घर का खरेदी करु शकलो नाही हा विचार मनात डोकावतो. तुमच्याकडे घर खरेदी करण्यासाठी आता किती पैसे आहेत, किती गृहकर्ज तुम्हाला मिळू शकते याचे तर्कवितर्क तुम्ही करु लागता. तुमची आर्थिक परिस्थिती आणि घराचे बजेट यामध्ये तफावत असेल तर त्यानुसार बर्हिमनात शंकाकुशंका येतात. ज्यामुळे मोठे घर घेण्याचा चांगला विचार आणि इच्छा अंर्तमन सहसा स्वीकारत नाही.

वास्तविक तुमची परिस्थिती कितीही बिकट असली तरी तुम्ही चांगल्या विचारांच्या माध्यमातून जीवनाचा संपूर्ण कायापालट

करु शकता. पण त्यासाठी आधी तुमच्या अंर्तमनाचा नकारात्मक पॅटर्न बदलायला हवा. मनात शंकाकुशंका येणार नाहीत याची काळजी घ्यायला हवी. विश्वप्रार्थना यावर रामबाण उपाय आहे. विश्वप्रार्थना सतत म्हटल्यामुळे मनातील चिंता-काळजी दूर होते. मनातील शंकाकुशंका (Noice) कमी होतात. विश्वप्रार्थनेतील 'सर्वांना' या शब्दाला विशेष महत्त्व आहे. विश्वप्रार्थना हा सर्वसमावेशक विचार आहे. तुम्ही विश्वप्रार्थना म्हणताना सर्वांसाठी मागता. आपण जेव्हा एखादी गोष्ट स्वतःसाठी मागतो तेव्हा आपल्या मनात परिस्थितीनुसार शंकाकुशंका येतात. पण जेव्हा आपण तिच गोष्ट सर्वांसाठी मागतो तेव्हा आपल्या मनात शंकाकुशंका येण्याची शक्यता कमी असते. ज्यामुळे तो विचार सहज अंर्तमनात जातो. विश्वप्रार्थनेमुळे मोठे आणि व्यापक विचार तुमच्या अंर्तमनात जातात. चांगले विचार आकाराला येण्यासाठी पूरक आणि पोषक परिस्थिती निर्माण होत जाते. तुमच्या प्रयत्नांना योग्य दिशा मिळते. बुद्धीची निर्णयक्षमता वाढते. तुमचा आत्मविश्वास वाढतो. तुमचे सकारात्मक विचार हळू हळू आकाराला येऊ लागतात. सर्वांसाठी मागितलेली गोष्ट तुम्हाला सर्वात आधी प्राप्त होते कारण सर्वांमध्ये तुम्ही देखील असता. सर्वांसाठी मागता मागता तुम्हाला चांगले विचार करण्याची सवय लागते. सतत शुभचिंतन केल्याने तुमची जीवनात भौतिक प्रगती होत जाते.

जीवनविद्या मिशनमध्ये आजवर अनेकांना याचा अनुभव आलेला आहे. विश्वप्रार्थना म्हटल्यामुळे त्यांच्या जीवनातील बिकट परिस्थिती बदलून चांगली परिस्थिती निर्माण झाली. त्यांना जीवनात जे जे हवे ते सर्व चांगले मिळाले. काही लोकांना अगदी रिसेशनच्या काळातही एकाऐवजी दोन ते तीन नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या. मुलांसाठी करिअरमध्ये ब्रेक घेतलेल्या महिलांना अनेक वर्षानंतरही पुन्हा करिअरची संधी निर्माण झाली. काही लोकांना स्वतःचे मोठे घर घेता आले. अनेकांच्या व्हिसासंदर्भातील समस्या सुटल्या. मी नेहमी सर्वांना सांगत असतो. "When prayers become your habit, then miracles become your lifestyle"

जीवनात सर्व काही मिळविण्यासाठी सर्वांनी मनापासून आणि प्रयत्नपूर्वक ही विश्वप्रार्थना म्हणण्याची सवय लावायला हवी. रात्री झोपण्यापूर्वी कमीत कमी अर्धा तास विश्वप्रार्थना म्हणणे फायद्याचे ठरेल. त्याचप्रमाणे दिवसभरात जेवढा रिकामा वेळ मिळेल त्या रिकाम्या वेळेत ही प्रार्थना तुम्ही म्हणू शकता. ज्यामुळे चांगले आणि व्यापक विचार अंर्तमनात जाणे अधिक सोपे होईल. तुमच्या अंर्तमनाचा पॅटर्न बदलेल आणि तुम्हाला जे जे हवे ते सर्व काही प्राप्त होऊ शकेल.

कधी कधी तुमची समस्या मोठी असेल तेव्हा ठराविक दिवस प्रार्थना म्हणून तुम्हाला कदाचित हवा तसा परिणाम दिसणार नाही. मग अशा वेळी काय करायचे? Satguru's prescription for all the problems is 'Prayer' Someone asked Satguru, "if it doesn't work?" Satguru smiled and replied, "Increase the dose." जसे एखाद्या आरोग्य समस्येवर डॉक्टर आपल्याला औषध लिहून देतात. पण ठराविक दिवस औषध घेऊनही आपल्याला लगेच बरे वाटत नाही. मग त्यावर डॉक्टर काय सांगतात. "औषधांचा डोस वाढवा" तसेच आपल्या आयुष्यातील कोणतीही समस्या केवळ प्रार्थनेने सुटू शकते. पण त्यासाठी प्रार्थनेची तीव्रता वाढविण्याची गरज आहे. तुम्ही विश्वप्रार्थना किती आणि कशी म्हणता यावर तुमच्या सर्व समस्यांचे निराकरण अवलंबून आहे. तेव्हा नियमित आणि अट्टाहासाने प्रार्थना म्हणण्याची सवय स्वतःला लावा आणि जीवनात चमत्कार कसे घडतात ते प्रत्यक्ष अनुभवा. (निरनिराळ्या भाषेत आणि प्रसिद्ध गायकांच्या आवाजात स्वरबद्ध अशी विश्वप्रार्थना आपण या QR code च्या माध्यमातून ऐकू शकता.)

**- श्री. प्रल्हाद वामनराव पै,**

आजीव विश्वस्त, जीवनविद्या मिशन

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## यक्षप्रश्न

विक्रमादित्य पुन्हा त्या झाडाकडे निघाला. अमावास्येची रात्र. मागे हरिकेन मिल्टन आले असताना वीज गेली तेव्हा जसा अंधार होता तसा अंधारआणि त्याच्या जोडीला स्मशान शांतता - विक्रमादित्याच्या मनात विचार आला आणि त्याचे त्यालाच हसू आले. कारण तो स्मशानातच होता. त्याने विचार केला. त्याने त्या झाडाकडे कूच केली. त्या झाडाशी पोहचताच त्याची नजर वर गेली. त्या अंधारातहि त्याला ते प्रेत दिसले. झाडावर चढून त्याने दोर कापला आणि ते प्रेत खाली पडले. विक्रमादित्य खाली उतरला आणि त्याने ते प्रेत खांद्यावर घेतले आणि त्याने चालायला सुरुवात केली. मागच्या अनेक वेळासारखेच त्यातला वेताळ त्याला प्रश्न विचारणार अशी त्याची

अपेक्षा होती. पण क्षणभर ती भयाण शांतता चालूच होती. आणि मग वेताळाने बोलायला सुरुवात केली.

वेताळ म्हणाला' अरे मला वाटले तू निराश झालास आणि मला विसरून गेलास की काय? नाही म्हणजे चांदोबा मासिक बंद झाले तसेच तू यायचेही बंद झाले. आणि माझी दर अमावास्येला तुला गोष्ट सांगायची सवय गेली. मला वाटले तू काही आता परत येणार नाहीस, पण तू नेटाने परत आलास - काय बरा आहेस ना? कोव्हीडच्या साथीतून तू सुटलेला दिसतोस. तुझ्या नावाने विक्रम सवत्स अशी काल मोजणे असते पण आता AC म्हणजे After Covid-BC म्हणजे Before Covid - असे म्हणतात म्हणे.' विक्रमादित्य काहीच बोलला नाही. मग वेताळच पुन्हा बोलू लागला,' अरे हो, मीच नाही का तुला सांगिंतले होते की तू जर बोलशील तर मी परत त्या झाडावर जाईन म्हणून - ठीक आहे मग मला आता पूर्वीसारखी तुला एक गोष्ट सांगू दे आणि हो -ज्या प्रमाणे जसे दर ४ वर्षांनी निवडणूका जवळ आल्या कि प्रत्येक पार्टी 'आम्हीच कसे तुमची काळजी करतो आणि तुम्हाला दुसऱ्या पार्टीच्या दुष्टपणा पासून वाचवू शकतो 'अश्या घोषण्या देतात, त्याप्रमाणे माझ्या अटी  पण त्याच आहेत. मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर तुला माहित असून तू जर दिले नाहीस तर तुझ्या डोक्याची हजार शकले होतील आणि तुझ्याच पायावर पडतील - आणि हो जगातला कुठलाही प्लास्टिक सर्जन त्यांना पुन्हा एकत्र करू शकणार नाही!' आणि वेताळाने गोष्ट सांगायला सुरुवात केली.

साइनफिल्ड किंवा फ्रेंड्स या सिटकॉमचे जसे री रन एपिसोडस असतात ते पाहत आहोत कि काय असे विक्रमादित्याला वाटले. आता हा गोष्ट सांगून बोअर करणार ह्याची त्याला खात्री होती. पण त्यावर उपाय नव्हता.

अविनाश मेरील लिंचच्या ऑफिसमध्ये बसला होता. दर ६ महिन्यांनी एकदा तरी तो advisor बरोबर पहिल्या  ६ महिन्यात काय झाले आहे आणि पुढच्या ६ महिन्यात काय करायचे ह्याबद्दल चर्चा करायला बसायचा. काही नवीन गुंतवणूक करायची का जुनेच पुढे चालू ठेवायचे. काही जुने शेयर विकून नव्या गोष्टीत गुंतवूणक करायची असा प्लॅन असायचा. मेरील लिंचच्या व्ही पी ने त्याच्या पुढे काही ऑपशन्स ठेवले.

VP म्हणाला. काही कंपन्या आयुरविमा पॉलिसी विकत घेत आहेत. अश्या  कंपन्यांचे  स्टॉक विकत घेणे - हा एक ऑप्शन आहे.

‘अश्या कंपन्या म्हणजे, मला समजले नाही. कंपन्या लाईफ इन्शुरन्स विकतात हे मला माहित आहे - पण त्या विकत घेतात  म्हणजे काय ?’ अविने विचारले.

‘मला वाटले तुम्हाला माहित असेल ‘,व्ही पी म्हणाला.

‘एड्स जेव्हा बोकाळला होता तेव्हापासून काही कंपन्यानि अश्या पेशंटच्या विम्याच्या पॉलिसी विकत घ्यायला  सुरुवात केली. एड्सचे निदान म्हणजे त्या काळात  मृत्यूची शिक्षा असायची. निदान झाल्यानंतर पहिली १-२ वर्षातच बरेच रोगी मरायचे. त्यामुळे त्यांच्या विमा पॉलिसी त्यांना काही पैशे देऊन विकत घ्यायच्या आणि मग ते मेल्यावर त्याच्या पॉलिसीची रक्कम ह्या कंपन्यांना मिळायची. म्हणजे एक लाखाची पॉलिसी २०००० डॉलर्सला विकत घ्यायची आणि मग जर रोगी  लवकर मेला  तर मालामाल म्हणजे २० हजाराचे १ लाख एक किंवा २ वर्षात मिळायचे. पण आता एड्स वर नवी औषधे निघाली आहेत आणि त्यामुळे असे रोगी बरेच वर्षे जगतात. त्यामुळे फायदा कमी.

त्यामुळे आता ह्यांची नजर म्हाताऱ्या लोकांकडे वळली आहे. अश्या लोकांना उतार वयात पैशाची गरज असते सोशल सिक्युरिटीत मिळणाऱ्या पैश्यात त्यांचे भागात नाही. नातवाचे वाढदिवस, वाढणारे प्रॉपर्टी कर, वाढती  महागाई, ह्याने पैशाची गरज वाढते आणि मग आता काय करायचे. विकत घेतलेल्या विम्याच्या पॉलिसीचा अश्या वेळी कसा उपयोग होणार? आणि मग ह्या विमा पॉलिसींवर ह्या कंपन्यांचा डोळा पडला. आणि मग त्या गरजू म्हाताऱ्या लोकांच्या पॉलिसिज ह्यांनी विकत घ्यायला सुरुवात केली.

तर अश्या कंपनींचे स्टॉक विकत घ्यायचे हा एक ऑप्शन आहे. सध्या AGING पॉप्युलेशन आहे. गेली ४ वर्षात महागाई वाढली आहे - मास आणि अंड्यांचा भाव तुम्हाला माहीतच आहे. त्यामुळे ह्या कंपन्याचा स्टॉक वर जाईल असा अंदाज आहे. म्हणून हा एक ऑप्शन आहे.'

अविनाशने त्याच्या कडे पहिले. मला वाटते की माझे उत्तर ---

वेताळ थांबला. त्याने विक्रमादित्याकडे पहिले. विक्रमादित्य न बोलता गोष्ट ऐकत होता. त्याच्या मनात विचार आला - खरोखर कलियुग आले आहे.

तो काही बोलत नाही हे पाहून वेताळाने पुन्हा बोलायला सुरुवात केली.

“तर राजा, अविनाशने काय उत्तर दिले असेल, त्याने ते का दिले असेल आणि त्याने काय उत्तर द्यावे असे तुला वाटते, ते तू सांग. आणि नेहमीप्रमाणे तुला जर उत्तर माहित असेल आणि तरी तू ते दिले नाहीस तर तुझ्या डोक्याचे १००० तुकडे होतील आणि ज्याच्यासाठी तू

येथे नेमाने दर अमावस्येला येतोस तो तुझा साधू पण ती जोडू शकणार नाही.'

विक्रमादित्यने विचार केला - आता ४ आठवड्याने परत यायला लागणार. त्याने खिशातला फोन काढला आणि कॅलेंडर पहिले. चार आठवड्याने एकाच अपॉइंटमेंट होती आणि ती पण सकाळी. म्हणजे मध्यरात्रीची अपॉइंटमेंट बुक झाली असे समजा. त्याने विचार केला आणि बोलायला सुरुवात केली.

लाईफ इन्शुरन्स पॉलिसी विकत घेणे म्हणजे कोण केव्हा मरणार ह्यच्यावर पैज लावणे आहे. जर ती व्यक्ती लवकर गेली तर आपला जास्त फायदा. म्हणजे ती व्यक्ती लवकर मरावी अशी आपली इच्छा असणार. एक प्रकारे ही हत्याच आहे. आणि एखादी वाईट इच्छा पुन्हा पुन्हा केल्यास त्याचे वाईट कर्मात रूपांतर होते. आपण स्वतः कोणाला मारणे किंवा कोणत्यातरी मारेकऱ्याला पैसे देऊन मारणे ह्यात फारच थोडा फरक आहे. पाप आणि पुण्य ह्यात सुद्धा असेच एक प्रकारचे ग्रेडेशन असते. आपण स्वतः पूजा करणे ह्याने जेवढे पुण्य मिळेल त्यापेक्षा कमी पुण्य एखाद्या गुरुजींना पैसे देऊन पूजा करायला सांगण्यात आहे. आपण पूजा करणे आणि दुसऱ्याने आपल्यासाठी पूजा करणे ह्यात फरक आहे. त्याच प्रमाणे आपण मारणे आणि दुसऱ्याकडून मारून घेणे ह्यात जरी फरक असला तरी शेवटी ते 'मारणेच' आहे. म्हणजे करता आणि करविता दोघेही जबाबदार आहेत. एखादा पाण्यात बुडत असताना त्याला मदत न करणे आणि एखाद्याचे डोके पाण्याखाली दाबून धरणे ह्यात फरक म्हणले तर आहे आणि म्हणले तर नाही, कारण शेवटी परिणाम एकच. त्यामुळे अश्या पॉलिसी विकत घेणे म्हणजे एखादा माणूस लवकर मरावा अशी इच्छा करणे - प्रार्थना करणे आहे. त्यामुळे पाप-पुण्याचा विचार करता अशा गोष्टीत पैसे गुंतवणे हे पाप आहे.

विक्रमादित्याचे उत्तर ऐकून वेताळ सुटला आणि परत त्या झाडाकडे जाऊन लटकला - पुढच्या अमावास्येची वाट पाहात.

- **डॉ. शिरीष कीर्तने**, लॉंगवूड, फ्लॉरिडा

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका




## मराठी भाषा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)

सध्या सर्वत्र AI हा परवलीचा शब्द झाला आहे. संगणक क्रांती, मोबाईल क्रांती आणि वर्तमानात होत असलेली AI क्रांती. AI वर संशोधन करणाऱ्या कंपन्या, त्यासाठी लागणाऱ्या पायाभूत सुविधा निर्माण करणाऱ्या कंपन्या, AI वापरून उत्पादनं विकसित करणाऱ्या कंपन्या, विविध देशांची सरकारे, विद्यापीठे, संरक्षण दले, वैद्यकीय क्षेत्रातील कंपन्या, शेअर बाजार यासारख्या असंख्य संस्था ते कामगार, नोकरदार, विद्यार्थी आणि सामान्यजन ह्या एका शब्दाने चकित, भयभीत, स्वप्रवत आणि गोंधळलेले असं बरंच काही झालेले दिसत आहेत. त्याविषयीच्या खोलात न शिरता, AI चा वापर करून घेण्यासाठी मराठी, भाषा म्हणून सिद्ध आहे का आणि हे तंत्रज्ञान मराठीसाठी आव्हान ठरेल का वरदान ठरेल ते समजून घेऊया.

सर्वात पहिल्यांदा AI च्या दृष्टीने मराठीची बलस्थाने कोणती आहेत ते बघूया. ८३ दशलक्षांहून अधिक लोकांची ही भाषा जगातील भाषांमध्ये १५-१६ क्रमांकावर आहे. भारतात ती ३-४ क्रमांकावर आहे. म्हणजेच ह्या भाषेचा वापरकर्ता वर्ग व बाजारपेठ मोठी असल्याने शिक्षण, आरोग्य, प्रशासन, न्याय व मनोरंजन क्षेत्रांत AI ची मागणी व वाढ सुनिश्चित आहे. मराठी ही २५०० वर्षांचा वारसा लाभलेली एक अभिजात भाषा असल्याने तिच्यात विपुल, विविधांगी व सखोल साहित्यिक परंपरा आहे. त्यामुळे समृद्ध AI मॉडेल्स विकसित करण्यासाठी मूळचा व भाषांतरीत असा मोठा संग्रह उपलब्ध आहे. महाराष्ट्र शासन, महाराष्ट्रातील विद्यापीठे आणि जगभरातल्या संस्था व कंपन्या मराठीतील डेटासेट्स तयार करण्यासाठी प्रोत्साहन व योगदान देत आहेत. त्यामुळेच मराठीची ताकद ही तिच्यातील वाढत्या मुक्त-स्रोत (Open Source) साधनांमध्ये आहे. म्हणजेच मराठीतील तज्ज्ञ लोकांसाठी रोजगाराच्या मुबलक संधीही उपलब्ध होत आहेत. तसंच मराठीच्या ४२ पेक्षा जास्त बोलीभाषा आहेत. त्यामुळे मराठी ही AI साठी समृद्ध प्रयोगशाळा बनली आहे. ही विविधता AI ला सर्वसमावेशक व परिपक्व करू शकते.

आता AI संबंधी काही तांत्रिक संज्ञा समजावून घेऊया. AI म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता. मानवी बुद्धिमत्ता ही क्षमता आणि वेगाच्या संदर्भात माणसाच्या मेंदूने सीमित झालेली आहे. ही सीमा ओलांडून टाकण्यासाठी कोणत्याही मशीन किंवा उपकरणाच्या कार्यप्रणालीत जी बुद्धिमत्ता विकसित करावी लागते ती म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता. जगभरातील लोकं दैनंदिन व्यवहारासाठी आणि कामानिमित्त वेगवेगळ्या भाषा बोलतात. ह्या AI प्रणालीबरोबर लोकांना त्यांच्या

भाषेत व्यवहार करता यावे म्हणून विकसित केलेल्या क्षमतेला Natural Language Processing (NLP) अथवा नैसर्गिक भाषा प्रक्रिया म्हणतात. हिचा उपयोग मानवी भाषा ओळखणं, तिच्यातील भावना समजून घेणं, त्याचा अर्थ लावणं, त्याचे आवश्यकतेप्रमाणे भाषांतर करणं आणि त्याचा प्रतिसाद तयार करणं हे आहे. हा प्रतिसाद निरनिराळ्या स्वरूपात असतो जसं की चित्र, संगीत, दृश्य, संगणकीय कोड किंवा मजकूर. त्यासाठी Generative AI म्हणजेच निर्मितीक्षम AI चा वापर केला जातो. ह्या निर्मितीक्षम AI ची एक उपशाखा म्हणजे Large Language Model (LLM) किंवा मोठे भाषा मॉडेल. ह्याचा उपयोग फक्त भाषा विषयक सामग्रीच्या (Content) निर्मितीत केला जातो. प्रत्येक Generative AI हे LLM नसतं. तसंच, प्रत्येक NLP मध्ये Generative AI चा वापर आवश्यक नाही.

आता मराठीची AI च्या संदर्भातील तयारी किंवा सिद्धता म्हणजेच AI Readiness ह्याविषयी माहिती घेऊया. त्याआधी एका गोष्टीचा खुलासा केला पाहिजे की AI Literacy म्हणजे AI साक्षरता ही लोकांशी निगडित आहे. लोकांमध्ये AI विषयी उद्बोधन करणं, त्यांना संभाव्य बदलांची माहिती देणं व AI चा परिणामकारक वापर करण्यासाठी योग्य ते प्रशिक्षण देणं म्हणजे AI साक्षरता. त्याउलट, AI सिद्धता ही तांत्रिक, भाषिक, आर्थिक व सामाजिक साधनांवर अवलंबून असते. वर उल्लेखिलेल्या मराठीच्या बलस्थानांमुळे मराठीची भाषिक सिद्धता तर झाली आहेच. तांत्रिक सिद्धताही बऱ्यापैकी वेगाने होत आहे. Marathi GPT सारखं संवादाचं मॉडेल उपलब्ध झालं आहे. Talkpal सारख्या साधनांमुळे परस्पर संवादातून भाषा शिकण्याची सोय झाली आहे. Tenorshare AI मुळे नैसर्गिक, प्रवाही व मानवसदृश मराठी मजकूर निर्माण करता येऊ शकतो. तर उच्चार व संवादात्मक सरावासाठी Talkio AI व LangBuddy चा वापर करता येऊ शकतो. Tabbly, OpenMic किंवा Nurix सारखी Voice AI ची साधनं आहेत. ElevenLabs व CAMB.AI सारखी text-to-speech (मजकुरातून संवाद) निर्मितीची साधनं उपलब्ध आहेत. महत्त्वाचं म्हणजे Microsoft, Google आणि OpenAI ह्यांसारख्या सर्व आघाडीच्या कंपन्यांची मराठी AI साधनं मोठ्या प्रमाणात वापरली जात आहेत. विविध बलशाली कंपन्यांचं व वेगवेगळ्या शासकीय आणि शैक्षणिक संस्थांचं आर्थिक पाठबळ मिळत आहे हे आपण बघतोच आहोत. सामाजिक सिद्धता ही मराठी समाजाच्या भरघोस प्रतिसादावर अवलंबून आहे. आपण मराठी AI चा जितक्या विविध स्तरांवर अधिकाधिक वापर करू तितकं हे AI प्रगल्भ होत जाईल.

ह्या निमित्ताने मराठीसाठी आव्हाने कोणती ते बघूया. अर्थातच, जागतिक भाषा असलेल्या इंग्रजीच्या तुलनेत मराठीत कमी प्रमाणात डेटासेट्स आहेत. डेटासेट्स म्हणजे भाषा शिकण्यासाठी आणि नवनिर्मितीसाठी लागणारे माहिती-संग्रह. नुसता मजकूरच नाही तर ऑडिओ, व्हिडिओ, ग्राफिक अशा सर्व प्रकारचे मराठीतले माहिती-संग्रह तयार व्हायला हवे आहेत. हे माहिती-संग्रह तपासण्यासाठी, त्यातल्या चुका सुधारून AI चा दर्जा वाढवण्यासाठी व भाषिक वैशिष्ट्ये अचूक राखण्यासाठी मराठी भाषेच्या जाणकारांची मोठ्या प्रमाणात मदत लागणार आहे. मराठी AI च्या प्रसाराचा व वापराचा वेग वाढवण्यासाठी अधिकाधिक गुंतवणूक व समाजाच्या सहभागाची गरज आहे. मराठीतील भाषिक सूक्ष्मता लक्षात घेऊन content निर्मितीसाठी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. तसंच, मराठीच्या बोलीभाषांना सामावून घेण्यासाठी व प्रादेशिक AI निर्मितीसाठी व्यापक प्रयत्नांची जोड हवी आहे. फक्त प्रमाण मराठी भाषेतील AI सक्षम होऊन उपयोगाचं नाही. महाराष्ट्राच्या प्रादेशिक वैविध्यांना जपणारं, त्या अस्मिता सांभाळणारं व त्यांच्या फायद्याचं AI विकसित करता आलं पाहिजे. थोडक्यात AI चं localization किंवा स्थानिकीकरण होणं गरजेचं आहे. त्या अनुषंगाने मराठीतील कलाकृतींचं डिजिटायझेशन वेगानं व्हायला पाहिजे.

मराठी AI साठी जरी आव्हाने असली तरी दूरच्या भविष्याचा विचार करता मराठी AI हे आपल्यासाठी वरदानच ठरणार आहे. आपल्या भाषिक समृद्धीचं जागतिक स्तरावर जतन होणं हा एक महत्त्वाचा फायदा आहे. त्याबरोबरच विविध भाषांतलं सकस व दर्जेदार साहित्य मराठीत सहज भाषांतरित होऊ शकतं. नुसतं साहित्यच नाही तर अनेक विषयांवरची माहिती खेडोपाडीच्या लोकांना घरबसल्या मराठीत मिळू शकते. मराठीतून शिक्षण न घेतलेल्या मराठी लोकांनाही अतिशय सुलभ व सोईस्करपणे मराठीत व्यक्त होता येईल. तसंच मराठीच्या शिक्षणासाठी सर्वात आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेणं आपल्याला शक्य होणार आहे ज्याचा फायदा आपल्या पुढच्या पिढीपर्यंत मराठी पोचवण्यासाठी होईल. मनोरंजनाच्या क्षेत्रात original content निर्माण करण्यासाठी जी चढाओढ सुरु आहे त्यातून अस्सल मराठमोळ्या कलाकृती प्रभावीपणे जागतिक स्तरावर पोचू शकतात. बोलीभाषांच्या संवर्धनाची व विकासाची वाट खुली होऊ शकते आणि इंग्रजीशिवाय स्थानिक भाषेत रोजचे व्यवहार करण्याची सुविधा मिळू शकते. एक महत्त्वाचा उपयोग म्हणजे दुर्लक्षित होत

चाललेल्या मराठी भाषा विषयाच्या अध्ययनाकडे रोजगाराची नवीन संधी म्हणून बघता येईल.

नवीन तंत्रज्ञान हे कायमच दुधारी अस्त्र असतं. जसजसं ते प्रगत होत जातं तसतसं त्याविषयीचे नियम, कायदे आकार घेत जातात. संगणकामुळे सुद्धा नोकरकपात होईल की काय अशी भीती लोकांना वाटत होतीच. पण आजही संगणक क्षेत्रात कुशल कामगारांचा तुटवडाच आहे. AI मुळे देखील बेरोजगारी पसरेल की काय अशी शंका अनेकांना भेडसावत आहे. त्याचं उत्तर येणारा काळ देईलच. परंतु, माझ्या प्रस्तुत विषयाच्या परिप्रेक्ष्यात AI हे मराठी भाषेसाठी लाभदायी ठरू शकतं असं माझं प्रांजळ मत आहे. तुमचे या संबंधीचे विचार जरूर कळवावे.

\- **अमित भावे,** गार्डन ग्रोव्ह, कॅलिफोर्निया

ऑडिओ रेकॉर्डिंग ऐका

## नाती...!

जन्मापासून नवी सुरुवात होते,
नात्यांची हळूहळू ओळख होते;
कळत नकळत नात्यांच्या धाग्यात,
जीवाची नाजूक गुंफण होते..!
नाती अनेक रुपात सभोवती,
गोड कटू आठवणीत वसती;
नात्यांतील अनुभव खरे सोबती,
जगणे समृद्ध करत जाती...!
नाते रक्ताचे, वा असो मैत्रीचे,
नाते असते मनाशी मनाचे;
बंध जुळता निरपेक्ष प्रेमाचे,
बंधन ना वाटे नात्याचे...!
अहंकार हाच शत्रू मोठा,
नाही त्यासी नात्यात जागा;
निस्वार्थी भावनेचा परीसस्पर्श होता,
नात्यास लाभते ईश्वरी कृपा...!

\- **शुभदा जोशी-पारखी,** कोलंबिया, मेरीलँड

**राशिभविष्य : जानेवारी २०२६**

**" वक्री गुरु, शततारका राहू आणि मीनेचा शनि तुम्हाला प्रसिद्ध करतात का, श्रीमंत करतात का परदेशी नेतात? आपले राशी भविष्य वाचा."**

**अजय तनखीवाले**

https://bmmonline.org/rashi-bhavishya/

## ग्रेटर रिचमंड मराठी मंडळ



व्हर्जिनिया राज्याच्या राजधानीचे शहर म्हणजे रिचमंड आणि या शहराच्या परिसरातील मराठी माणसांचे आपुलकीचे स्थान म्हणजे ग्रेटर रिचमंड मराठी मंडळ! मंडळाचे अध्यक्ष डॉक्टर अमित कोर्डे यांच्याशी गप्पा मारताना तेथील मराठी समुदायाच्या उत्साहाचा अनुभव आला आणि परदेशातही आपली संस्कृती जपण्याच्या त्यांच्या प्रयत्नांबद्दल माहिती मिळाली. सन २००७ साली भूषण आपटे, भारती खोपकर, संजय मुळे आणि मित्रमंडळींनी स्थापन केलेले मंडळ आज १९२ सभासदांसह वृद्धिंगत होत आहे.

मंडळातर्फे वर्षभरात संक्रांती, नाट्यदर्पण, कॅम्पिंग, गणेशोत्सव, एखाद्या व्यावसायिक नाटकाचे तसेच मराठी चित्रपटाचे आयोजन असे अनेक कार्यक्रम सादर केले जातात. संक्रातीच्या कार्यक्रमात लहान मुलांचे बोरन्हाण, बायकांचे खेळ, होम मिनिस्टर यांसारखे कौटुंबिक खेळ आखले जातात.

नाट्यदर्पण सोहळ्यात रिचमंड तसेच अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील मराठी मंडळांतील हौशी कलाकारांना त्यांची कला १५ मिनिटांच्या लघु एकांकिकेतून मांडण्याची संधी मिळते.

मंडळाचे सदस्य जूनच्या दुसऱ्या आठवड्यात होणाऱ्या कॅम्पिंगची वाट पाहत असतात. डोंगराळ भागातून मनसोक्त भटकंती, रात्री होणारा शेकोटीभवतीचा कार्यक्रम, गाणी, गप्पा, योगाभ्यास, क्रिकेटसारखे खेळ या सगळ्यांमुळे ही कॅम्पिंग नेहमीच यादगार ठरते.

दर वर्षी हे मंडळ स्थानिक मंदिराच्या सहयोगाने दहा दिवस गणेशोत्सव उत्साहात साजरा करते. महाप्रसादाच्या दिवशी ५००हून अधिक भाविक गणपतीच्या दर्शनासाठी येतात; विविध सांस्कृतिक कार्यक्रमांत भाग घेतात आणि खास मराठमोळ्या जेवणाचा आस्वाद घेतात. ढोलताशा पथकाचे प्रदर्शन आणि गणपतीची आरास ही ह्या सोहळ्याची खास वैशिष्ट्ये. ह्या वर्षी साकारलेला लोकमान्य टिळकांचा केसरी वाडा लक्षणीय होता. तसेच ज्येष्ठ नागरिकांनी प्रस्तुत केलेली भजनसंध्याही संस्मरणीय होती.

मंडळ बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मार्गदर्शनाखाली मराठी शाळा चालविते. यात १००हून अधिक विद्यार्थी मराठी शिकतात. सन २०२३ मध्ये बृहन्महाराष्ट्र मंडळाने आयोजित केलेल्या स्थानिक अधिवेशनात

ग्रेटर रिचमंड मराठी  मंडळाने हिरीरीने भाग घेतला होता. या प्रसंगी रेशीमगाठी ह्या विवाहोत्सुक तरुण-तरुणींच्या  मेळाव्याचे आयोजन करण्यातही मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला होता.
आपल्या सामाजिक उपक्रमांतर्गत मंडळ इतर भारतीय भाषिक संस्थांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करीत आहे. याद्वारे परदेशस्थ भारतीयांच्या प्रश्नांवर काम करणारी एक सक्षम संघटना उभी करण्याचा मंडळाचा मानस आहे.

बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या वृत्ताच्या चमूतर्फे ग्रेटर रिचमंड मराठी मंडळाच्या सदस्यांना आणि कार्यकारी समितीला नवीन वर्षाच्या अनेकोत्तम शुभेच्छा!

## प्रेम, प्रेम म्हणजे ....

उत्तर अमेरिकेतील सर्व साहित्यप्रेमींना सप्रेम नमस्कार. बृहन्महाराष्ट्र मंडळ आपल्या मातृभाषेचा गोडवा जपण्यासाठी निरंतर कार्यरत असते. तुमच्या शब्दांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा हा आमचा एक प्रामाणिक प्रयत्न..

**BMM आयोजित भव्य काव्यस्पर्धा -**

जर तुम्हाला तुमच्या मनातल्या भावनांना कवितेतून वाट करून देता येत असेल तर ही स्पर्धा खास तुमच्यासाठी आहे आणि स्पर्धेचा विषय आहे **‘प्रेम’**

**स्पर्धेची रूपरेषा:**

विषय: प्रेम (Love) ❤️

(प्रेम म्हणजे फक्त रोमँटिक नाही, तर वात्सल्य, निसर्गप्रेम किंवा ईश्वरावरील प्रेमही असू शकते याची कृपया नोंद घ्यावी )

**नियम व अटी:**

१. पात्रता: ही स्पर्धा फक्त उत्तर अमेरिकेतील (USA & Canada) स्पर्धकांसाठी खुली आहे.

२. वय: १६ ते ८६ वर्षे.

३. काव्यप्रकार: मुक्त (छंदबध्द किंवा मुक्तछंद - कवीच्या पसंतीनुसार).

४ मर्यादा: जास्तीत जास्त २० ओळी.

५. भाषा: मराठी.

६. अट: कविता स्वरचित असावी आणि कोणत्याही मासिकात, सोशल मीडियावर किंवा पुस्तकात प्रकाशित झालेली नसावी (Unpublished).

तुमच्या कवितांचे परीक्षण BMM वृत्ताच्या संपादक मंडळातील सदस्य, कार्यकारिणी सदस्य आणि एक नामवंत कवी/कवयित्री यांच्यामार्फत केले जाईल.

**महत्वाच्या तारखा:**

* कविता पाठवण्याची अंतिम तारीख: **२८ फेब्रुवारी**

* विजेत्यांची नावे आणि त्यांच्या कविता ***१ एप्रिल** *च्या अंकात प्रसिद्ध केली जातील.

**बक्षिसे:**

स्पर्धक संख्येनुसार विजेते घोषित केले जातील. विजेत्यांची निवड हा परीक्षकांचा अंतिम निर्णय असेल याची नोंद घ्यावी .

चला तर मग , प्रेमाचे विविध रंग शब्दांतून मांडायला सुरूवात करा आणि तुमची स्वरचित कविता लवकरात लवकर vrutta@bmmonline.org या ईमेल आयडीवर पाठवा . (Subject line: BMM कविता स्पर्धा २०२६). कविता word doc मध्ये असावी. आपले नाव आणि शहराचे नाव मराठीत लिहिलेले असावे.

आपले नम्र,

- **संयोजक समिती, बृहन्महाराष्ट्र मंडळ (उत्तर अमेरिका)**

संकल्पना : गौतम पंगू    रेखाटन: विनिता वेल्हाळ




-

## सूर्यमालेपलीकडून आलेला अलीकडचा पाहुणा: 3I/ATLAS

२०२७मध्ये व्हॉएजर-१ यान पृथ्वीपासून एक प्रकाश दिवस एवढ्या अंतरापर्यंत पोचेल. आपल्या सौरमंडळाला सर्वात जवळचा तारा चार प्रकाशवर्षांपेक्षा जास्त दूर आहे. याचाच अर्थ मानवाचे अवकाशभ्रमण अजूनही आपल्या अंगणापुरतेच मर्यादित आहे. असे असताना दुसऱ्या तारामंडळातून आलेले पाहुणे बरीच खळबळ माजवतात यात काही नवल नाही. असे मोजकेच खगोल प्रवासी आपल्या माहितीचे आहेत. कल्पना करा की आपला सूर्य एका रेसकोर्सच्या मध्यभागी आहे आणि पृथ्वी आणि इतर ग्रह त्या रेसट्रॅकवर धावणाऱ्या गाड्यांप्रमाणे त्याच्याभोवती आपापल्या ठराविक लंबवर्तुळाकार कक्षेत कोट्यावधी वर्षे फिरत आहेत. पण कधीकधी, एखाद्या अत्यंत दूरच्या, वेगळ्या ताऱ्याच्या जगातून एक खास पाहुणा आपल्या सूर्यमालेत - या रेसकोर्सवर - झेपावतो. भलत्याच दिशेने. हे पाहुणे येथे कायमचे थांबत नाहीत, कारण ते दूर अंतराळातून आलेले अनाहूत प्रवासी असतात, आणि वेगाने येऊन तेवढ्याच लगबगीने दूर जातात.




https://arxiv.org/pdf/2507.05252 या आमच्या शोधनिबंधातून घेतलेले 3I/ATLAS चा मार्ग दाखवणारे हे चित्र.

आजवर आपल्याला असे फक्त तीनच पिंड माहित आहेत, आणि त्यातील सर्वात नवा पाहुणा म्हणजे '3I/ATLAS'. 3I/ATLAS चा शोध १ जुलै २०२५ रोजी चिली येथील 'ATLAS' टेलिस्कोपद्वारे लावला गेला, म्हणूनच याच्या नावात 'ATLAS' हे नाव आहे. '3I' चा अर्थ असा की, हा आजवर ज्ञात झालेला तिसरा 'आंतरतारकीय' (Interstellar) पिंड आहे. हे 'UFO' नसून 'ISO' (Interstellar Objects) आहेत. नंतर शास्त्रज्ञांना 'ZTF' सारख्या इतर प्रकल्पांमधून १५ जून २०२५पर्यंतच्या जुन्या प्रतिमा (precovery) देखील मिळाल्या, ज्यात हा पाहुणा आधीच टिपला गेला होता. याची कक्षा सूर्यमालेच्या प्रतलाशी साधारण समांतर आहे (५ डिग्रीने कललेली); पण त्याचा मार्ग ग्रहांच्या उलट दिशेने (retrograde) आहे. यावरून हा पाहुणा आकाशगंगेच्या एका वेगळ्या भागातून आला आहे आणि त्याचा पिंड प्राचीन आहे हे लगेचच कळले.

**हे पाहुणे कसे ओळखायचे? :** खगोलशास्त्रज्ञ रात्रीच्या आकाशाचा वेध घेणाऱ्या दुर्बिणींच्या साहाय्याने या पाहुण्यांचा शोध घेतात. त्यांच्या कक्षेवरून ते सूर्यमाले बाहेरून आले आहेत हे समजते. आपल्या सूर्यमालेतील ग्रह आणि धूमकेतू सूर्याभोवती लंबवर्तुळाकार (Ellipses) कक्षेत फिरतात. पण अशा आंतरतारकीय पाहुण्यांची कक्षा 'हायपरबोलिक' (Hyperbolic) असते. याचा अर्थ असा की, त्यांचा वेग इतका प्रचंड असतो की सूर्याचे गुरुत्वाकर्षण त्यांना पकडून ठेवू शकत नाही. पृथ्वीच्या कक्षेची 'एक्सेंट्रिसिटी' (Eccentricity) सध्या ०.०१६७ इतकी आहे म्हणजेच पृथ्वीची कक्षा जवळजवळ गोलाकार आहे. त्याविरुद्ध 3I/ATLAS च्या कक्षेची एक्सेंट्रिसिटी तब्बल ६.१ आहे, म्हणजे त्याची हायपरबोलिक कक्षा अतिशय "खुली" (open) आहे; तो आत येतो, सूर्याजवळून वळतो आणि पुन्हा कायमचा बाहेर निघून जातो.

**आपले आजवरचे तीन खास पाहुणे:**

- 1I/Oumuamua (२०१७) - पहिला पाहुणा: हा आपला पहिला अधिकृत आंतरतारकीय पाहुणा होता. तो अत्यंत रहस्यमय होता. एखाद्या सिगारसारखा लांबट आकार आणि धूमकेतूंना असतात तश्या शेपटाविना. शास्त्रज्ञांच्या मते तो एक खडकाळ पदार्थ किंवा विरळ बर्फाचा बनलेला असावा.
- 2I/Borisov (२०१९) - धूमकेतूसदृश्य पाहुणा: हा पाहुणा अगदी आपल्याकडील धूमकेतूंसारखाच होता. सूर्याच्या जवळ आल्यावर उष्णतेमुळे त्यातील बर्फाचे वायूत रूपांतर झाले आणि त्याभोवती धूळ व वायूंचे ढग (Coma) तयार झाले. यावरून इतर तारा प्रणालींमध्येही आपल्या सूर्यमालेत असतात तसेच धूमकेतू असू शकतात या तर्काला बळ देणारा पुरावा मिळाला.
- 3I/ATLAS (२०२५) - मोठा आणि वेगवान पाहुणा: हा सर्वात नवीन पाहुणा आहे. हा देखील एक धूमकेतू आहे, पण त्यातील

काही रासायनिक गुणधर्म लक्षवेधी आहेत. साधारण धूमकेतूंमध्ये पाण्याचे रेणू हे कार्बन-डाय-ऑक्साइडच्या रेणूंपेक्षा कितीतरी जास्त असतात. यात मात्र कार्बन डायऑक्साइड पाण्याच्या बर्फाच्या तुलनेत आठपट आहे; तसेच यात निकेल (Nickel) धातू भरपूर प्रमाणात आहे.

**आपल्या अंतराळयानांपेक्षाही वेगवान:** 3I/ATLAS सध्या ताशी सुमारे २,२०,००० किलोमीटर (६१ किमी प्रति सेकंद) वेगाने प्रवास करत आहे. तुलना करायची झाल्यास, पृथ्वीचा सूर्याभोवती फिरण्याचा वेग ३० किमी प्रति सेकंद, तर मानवनिर्मित सर्वात वेगवान यान व्हॉयेजर १ ची गती केवळ १७ किमी प्रति सेकंद. म्हणजेच 3I/ATLAS व्हॉयेजर १ पेक्षा चौपट गतीने मार्ग क्रमतो आहे.

**3I/ATLAS मधील नवीन शोध:** जेम्स वेब टेलिस्कोप (JWST) आणि इतर प्रगत दुर्बिणींनी या पाहुण्याबद्दल काही थक्क करणारे शोध लावले आहेत:

**१. कार्बन डायऑक्साइडचा 'राक्षस':** 3I/ATLAS मध्ये पाण्याच्या बर्फाच्या तुलनेत कार्बन डायऑक्साइडच्या बर्फाचे प्रमाण ८:१ इतके आहे. आजवर कोणत्याही धूमकेतूंमध्ये दिसलेल्या उच्चतम मूल्यांपैकी एक आहे.

यावरून असे सूचित होते की, या धूमकेतूची निर्मिती त्याच्या मूळ ताऱ्यापासून खूप दूर, एका अत्यंत थंड आणि दीर्घकाळचा किरणोत्सर्ग/कॉस्मिक किरणांचा प्रभाव असलेल्या परिसरात झाली असावी.

**२. आकाशगंगेतील एक ज्येष्ठ नागरिक:** 3I/ATLAS चा प्रचंड वेग आणि त्याची दिशा लक्षात घेता, शास्त्रज्ञांचा असा अंदाज आहे की हा धूमकेतू ७ ते ११ अब्ज वर्षे जुना आहे. हा आपल्या आकाशगंगेच्या 'थिक् डिस्क' (Thick Disk) या भागातून आला असावा—जेथील ताऱ्यांची वस्ती अत्यंत प्राचीन मानली जाते.

**३. निकेलचे गूढ:** खगोलशास्त्रज्ञांना या धूमकेतूच्या शेपटीत अणुरूपात असलेल्या निकेलचे बाष्प आढळले आहे. आपल्या सूर्यमालेतील धूमकेतूंमध्येही निकेल असते, परंतु 3I/ATLAS मध्ये लोहाच्या तुलनेत निकेलचे प्रमाण असामान्यपणे जास्त आहे. एक कयास असा आहे की या पाहुण्याची निर्मिती आकाशगंगेच्या अशा भागात झाली असावी जिथे 'टाईप १ए सुपरनोव्हा' या प्रक्रियेने सूर्याच्या जन्माआधी मरण पावलेल्या ताऱ्यांच्या स्फोटांतून बाहेर पडलेली 'राख' मोठ्या प्रमाणात उपलब्ध होती.

**हे एखादे परग्रहवासीयांचे यान (Spacecraft) आहे का? :** 3I/ATLAS च्या या आगळ्यावेगळ्या स्वरूपामुळे "हे एखादे परग्रहवासीयांचे तंत्रज्ञान असावे" असे दावे केले गेले आहेत. दावेकर्त्यांमध्ये हारवर्डचा एक खगोलशास्त्रज्ञही आहे. हे दावे सनसनाटी असल्याने प्रसारमाध्यमे त्यांना मोठी प्रसिद्धी देतात. परंतु, म्हणूनच आपल्याला अधिक सावध राहण्याची गरज आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे केवळ विज्ञानातीलच नव्हे, तर आयुष्यातील कोणत्याही 'अति-रोमांचक' दाव्याकडे संशयाने आणि तर्कशुद्ध विचाराने पाहणे. एखादा दावा परमपूज्य नेत्याकडून आला असो वा वैज्ञानिकाकडून. जोपर्यंत एखाद्या गोष्टीचे नैसर्गिक स्पष्टीकरण शक्य आहे, तोपर्यंत अनैसर्गिक निर्मिती ग्राह्य मानण्याचे कारण नाही.

**अवकाशातून वाहत आलेल्या बाटलीतला संदेश:** 3I/ATLAS १९ डिसेंबर २०२५ रोजी पृथ्वीच्या सर्वात जवळ होता (पण तरी सूर्य-पृथ्वी अंतराच्या जवळजवळ दुप्पट हे अंतर होते: ~1.8 AU, सुमारे 270 दशलक्ष किमी). आता पुन्हा तो दूर जाऊ लागला आहे -- ताशी सुमारे २,२०,००० किलोमीटर वेगाने. हे एखादे यान नसले तरी, ते वैज्ञानिक दृष्टीने त्यापेक्षाही मौल्यवान आहे. हा एक प्राचीन, गोठलेला संदेश आहे. याला अभ्यासणे म्हणजे १० अब्ज वर्षांपूर्वीची आकाशगंगा कशी होती, हे पाहण्यासारखे आहे. तो पुन्हा कधीही न परतण्यासाठी निघून जाईल, पण दिसेनासा होईपर्यंत शास्त्रज्ञ अधिक निरीक्षणे करून याला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्याचा प्रयत्न करत राहतील. भविष्यात आकाशात अधिक दुर्बिणी नजर ठेवून असल्यामुळे, आपल्याला असे अनेक पाहुणे सापडतील अशी अपेक्षा आहे. जरी हे नैसर्गिकरित्या तयार झालेले पदार्थ आपल्या सूर्यमालेकडे वाहत आले असले, तरी भविष्यात एक दिवस आपली अंतराळयाने देखील असे अफाट आंतरतारकीय अंतर पार करून इतर ताऱ्यांभोवती फिरणाऱ्या ग्रहांपर्यंत कदाचित प्रवास करू शकतील.

**तर्कशुद्ध विचारांची शिदोरी:**
**दावे मोठे असतांना विचारायचे साधे प्रश्न:**

एखाद्या गोष्टीसाठी “अतिप्रगत तंत्रज्ञान”, “परग्रहावरून आलेले यान”, किंवा “नैसर्गिक नियमांमध्ये न बसणारे” अशी लेबले लावली जातात, तेव्हा बहुतेक वेळा काही ठराविक मुद्दे पुढे केले जातात. 3I/ATLAS बाबतही तसेच झाले. पण अशा दाव्यांकडे पाहताना, केवळ खगोलशास्त्रातच नव्हे तर आयुष्याच्या इतर अनेक क्षेत्रांतही, काही सोपे प्रश्न फार उपयुक्त ठरतात.

**१. हे नैसर्गिकरीत्या होऊ शकते का?**

3I/ATLAS बाबत सांगितले जाते की त्याची रचना “विचित्र” आहे—त्यात कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण जास्त आहे, निकेल आढळते, आणि त्याचा वेग प्रचंड आहे.

**पण प्रश्न असा विचारायचा:** या सगळ्याचे नैसर्गिक स्पष्टीकरणे शक्य आहे का?

उत्तर होकारार्थी असेल, तर कृत्रिम तंत्रज्ञानाचा निष्कर्ष काढण्याची गरज उरत नाही.

इथेही तसेच आहे—धूमकेतूंचे रसायनशास्त्र, किरणोत्सर्गाचा दीर्घ परिणाम, आणि ताऱ्यांच्या स्फोटांतून आलेली द्रव्ये या सगळ्यांतून हे गुणधर्म सहज समजावता येतात.

**साधा नियम:** जोपर्यंत नैसर्गिक स्पष्टीकरण अपुरे ठरत नाही, तोपर्यंत असामान्य निष्कर्ष पुढे आणू नयेत.

**२. यामागे उद्देश दिसतो का?**

अतिप्रगत तंत्रज्ञानाचा दावा बहुतेक वेळा एखादा “हेतू” गृहित धरतो—कोणीतरी बनवले आहे, आणि त्याच्या हालचाली हेतुपूर्वक नियंत्रित केल्या जात आहेत.

**म्हणून विचारायचा प्रश्न असा:** या वस्तूच्या वर्तनातून असा कोणताही उद्देश दिसतो का?

3I/ATLAS कुठेही थांबत नाही, दिशा बदलण्यासाठी इंजिन वापरत नाही, कोणत्याही ग्रहाशी संवाद साधत नाही. त्याचा मार्ग गुरुत्वाकर्षण आणि सूर्याच्या उष्णतेमुळे होणाऱ्या वायू-उत्सर्जनाने जितका बदलू शकतो, तितकाच बदलतो.

**साधा नियम:** जर एखाद्या वस्तूचे वर्तन ज्ञात भौतिक प्रक्रियांतून पूर्णपणे समजावता येत असेल, तर त्यामागे अतिरिक्त, हेतुपूर्वक हस्तक्षेप गृहित धरण्याचे कारण उरत नाही.

**३. पुरावे काय दर्शवतात?**

काही वेळा एखादा घटक—इथे निकेल—पाहून लगेच निष्कर्ष काढले जातात: “हे तर औद्योगिक अवशेष असू शकतात.”

**पण प्रश्न असा हवा:** हा पुरावा स्वतंत्रपणे पाहिला, तर तो काय दर्शवतो?

निकेल हा ताऱ्यांमधील एक सामान्य घटक आहे. तो धूमकेतूंमध्ये अणुरूपात आढळतो, आणि तो आपल्याला अब्जावधी वर्षांपूर्वीच्या ताऱ्यांच्या स्फोटांची आठवण करून देतो.

तो कृत्रिम आहे, असे म्हणण्यासाठी अतिरिक्त, स्वतंत्र पुरावे लागतात—फक्त “अनोखा वाटतो” इतके कारण पुरेसे नसते.

**साधा नियम:** पुरावे स्वतः काय सांगतात ते पहावे; आपल्याला काय वाटते ते त्यांच्यावर लादू नये.

**४. सगळे गुणधर्म एकत्र पाहिल्यावर काय दिसते?**

शेवटचा, पण महत्त्वाचा प्रश्न: सगळे गुणधर्म एकत्र पाहिल्यावर ही वस्तू कशासारखी दिसते?

3I/ATLAS ला कोमा आहे, शेपटी आहे, बर्फ वितळून वायू बाहेर पडतो, त्याची कक्षा हायपरबोलिक आहे—हे सगळे धूमकेतूंचेच गुणधर्म आहेत.

मग ती वस्तू धूमकेतू आहे, असे मानणे हा सर्वात साधा, सुसंगत आणि पुराव्यांशी जुळणारा निष्कर्ष ठरतो.

**साधा नियम:** जेव्हा एखादी गोष्ट सर्व लक्षणांनी एखाद्याच वर्गात बसते, तेव्हा तिला वेगळ्या, अदृश्य वर्गात ढकलण्याची गरज नसते.

**हा विचार इथेच थांबत नाही**

हे प्रश्न केवळ 3I/ATLAS साठी नाहीत. ते कोणत्याही अतिरोमांचक दाव्यासाठी लागू होतात—वैद्यकीय चमत्कार, AI बद्दलचे दावे, राजकीय कटसिद्धांत, किंवा रोजच्या आयुष्यातील अफवा. विज्ञान म्हणजे उत्तरांची यादी नाही; योग्य प्रश्न विचारण्याची शिस्त असते.

- **आशिष महाबळ,** पॅसाडेना, कॅलिफोर्निया

## पु. ना. गाडगीळ (पीएनजी) ज्वेलर्स - एक सोनेरी परंपरा

**भाग २: आशुतोष जोशी यांची मुलाखत**

*(या मुलाखतीचा पहिला भाग वृत्ताच्या २०२५ च्या दिवाळी अंकात प्रकाशित करण्यात आला होता.)*

पीएनजी ज्वेलर्स ही महाराष्ट्राच्या व्यापार क्षेत्रातील एक सोनेरी आणि गौरवास्पद परंपरा. त्यांनी बृहन्महाराष्ट्र मंडळाला नेहमीच पाठिंबा दिला आहे. पीएनजी ज्वेलर्सचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक डॉ. सौरभ गाडगीळ आणि अमेरिकेतील पदाधिकारी श्री. आशुतोष जोशी ह्यांच्याशी साधलेला हा संवाद २ भागांत आपल्यापुढे

सादर करीत आहोत. पहिल्या भागात **डॉ. सौरभ** यांचे विचार जाणून घेतले तर या भागात पीएनजी ज्वेलर्सचे अमेरिकेतील हसतमुख आणि कार्यप्रवीण पदाधिकारी **श्री. आशुतोष जोशी** यांची मुलाखत आपल्यापुढे मांडत आहोत.

**वृत्त-टीम:** आशुतोष, तुमची पार्श्वभूमी, शिक्षण आणि परिवार ह्यासंबंधी जाणून घ्यायला आम्हाला आवडेल.

**आशुतोष:** मी मूळचा पुण्याचा असून फार्मसी शाखेचा पदवीधर आहे.२००० साली मी बी. फार्म. केल्यानंतर सिम्बॉयसिस संस्थेमधून Foreign Trade या विषयात MBA केले. त्यानंतर १२ वर्षे मी फार्मास्युटिकल कंपन्यांमध्ये काम केले. त्यामध्ये माझा portfolio हा प्रामुख्याने इंटरनॅशनल बिझनेस डेव्हलपमेंटचा होता. गेल्या १३ वर्षांपासून मी पीएनजीसोबत आहे. माझ्या पत्नीने शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले असून ती व्यावसायिक गायिका आहे. भारतात आणि इथे ती गाण्याचे वर्ग घेते.

**वृत्त-टीम:** पीएनजी ज्वेलर्सबरोबर प्रवास कसा चालू झाला?

**आशुतोष:** सौरभ आणि मी MBA ला क्लासमेट्स असताना आमची चांगली मैत्री झाली, जी कॉलेज संपल्यानंतरही कायम राहिली. जेव्हा सौरभने अमेरिकेत पीएनजी ज्वेलर्सची शाखा उघडण्याच्या दृष्टीने मार्केट-स्टडी करायचा विचार केला तेव्हा मला विचारले. इंटरनॅशनल बिझनेस डेव्हलपमेंटचा अनुभव माझ्या गाठीशी होताच. मलाही हे क्षेत्र आव्हानात्मक वाटले. तिथून माझा पीएनजीबरोबर व्यावसायिक प्रवास सुरु झाला. २००८ मध्ये, सौरभने अमेरिकेत पीएनजी ज्वेलर्सच्या पहिल्या दालनाचे उद्घाटन केले. त्यावेळी दुर्दैवाने माझा L1 व्हिसा झालेला नसल्याने मला येथे येता आले नाही आणि मी परत फार्मा कंपनीत कामाला गेलो. नोव्हेंबर २०१३ मध्ये सौरभ पीएनजी ज्वेलर्समध्ये प्रोफेशनल एक्सपिरियन्स असलेल्यांची नवीन टीम उभी करत होता त्यावेळी मी पुन्हा एकदा पीएनजीशी जोडला गेलो. सुरुवातीला मी सेल्स आणि मार्केटिंग, कॉर्पोरेट स्ट्रॅटेजी आणि कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) टीमचा प्रमुख होतो. त्यात माझ्या पोर्टफोलिओमध्ये इंटरनॅशनल बिझनेस पण आला आणि आम्ही दुबईमध्ये दुकान उघडलं. त्यानंतर फ्रीमॉण्ट (कॅलिफोर्निया) मध्ये आणि एडिसन (न्यूजर्सी)लाही दुकाने चालू केली. त्याच दरम्यान मी २०१७ मध्ये L1 व्हिसावर इकडे आलो.

**वृत्त-टीम:** अमेरिकेत ज्वेलरीचा व्यवसाय सुरु करून त्यात यश मिळवणे, हे मराठी माणसासाठी हटके आहे! हा विचार कसा आला?

**आशुतोष:** हा विचार सौरभचा. अमेरिकेत भारतीय लोक मोठ्या संख्येने राहतात. भारतीय वंशाच्या ग्राहकांसाठी दागिना म्हणजे केवळ अलंकार नाही, तर परंपरेचा, आठवणींचा आणि गुंतवणुकीचा भाग असतो. अमेरिकेत अनेक ज्वेलर्स असले तरी पारंपरिक भारतीय दागिने मिळणे कठीण होते. अमेरिकेतील भारतीयांना लग्नसमारंभ, सण-उत्सव अशा कार्यक्रमांमध्ये प्रत्यक्ष दुकानास भेट देऊन पारंपारिक भारतीय दागिने खरेदी करण्याचा अनुभव देऊ, या कल्पनेने पीएनजी ज्वेलर्सने अमेरिकेत दुकान काढण्याचा विचार केला.

**वृत्त-टीम:** या सगळ्यासाठी भक्कम पूर्व तयारी करायला लागली असेल.

**आशुतोष:** हो. त्या अनुषंगाने मी आणि सौरभने २००७ साली अमेरिकेत सिएटल येथे बीएमएम अधिवेशनात पीएनजीचा बूथ ठेऊन मराठी लोकांशी संवाद साधला आणि त्यांचा कल आजमावला. त्या अधिवेशनानंतर बे एरियात जवळजवळ महिनाभर राहून आम्ही मार्केट कसे आहे ते बघितले, काही जागाही बघितल्या. त्यानंतर २००७ च्या दिवाळीमध्ये आम्ही इथे एक प्रदर्शन केलं. त्यालाही खूप चांगला प्रतिसाद मिळाला आणि खात्री पटली.

**वृत्त-टीम:** भारतापेक्षा येथे काही वेगळी मार्केटिंगची तंत्रे वापरावी लागतात का?

**आशुतोष:** येथील महाराष्टीयन - मराठी लोकांना पु. ना. गाडगीळ हे नाव माहिती होते. पण पीएनजी हा नवीन ब्रँड आणि पु. ना. गाडगीळ हे एकच आहेत हे त्यांना जाहिराती, प्रदर्शने आणि सोशल ॲक्टिव्हिटीज मधून लक्षात आणून द्यावे लागले. आम्ही येथील तेलगू, तमिळ, गुजराथी अशा वेगवेगळ्या अमराठी समाजातील लोकांशी संपर्क साधून त्यांना पीएनजीच्या सोन्या-चांदीच्या व्यवसायातील परंपरेची जाणीव करून दिली. हा भारतातून बे एरियात आलेला पहिला ब्रँड असल्यामुळे लोकांनाही त्याची उत्सुकता होती. त्याचा फायदा आम्हाला झाला. तसेच माधुरी दीक्षितसारख्या सर्वपरिचित आणि लोकप्रिय ब्रँड-अम्बॅसॅडरचा मार्केटिंगसाठी चांगला फायदा झाला.

**वृत्त-टीम:** अमेरिकेतली गिऱ्हाईके महाराष्ट्रातील गिऱ्हाईकांपेक्षा वेगळी असतात का?

**आशुतोष:** चोखंदळपणाबाबतीत भारतातील ग्राहक आणि येथील भारतीय ग्राहक यांचा अनुभव खूपसा सारखा आहे. भारतात आणि इथेही दागिन्यांची खरेदी हा एक सोहळा असतो; तो अनुभव त्यांना मिळावा ह्यासाठी कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणे महत्वाचे होते. भारतातून आलेले दोन-तीन जण वगळता आमचे स्थानिक इंडियन अमेरिकन कर्मचारी नवीन होते. ग्राहकांशी कसे वागायचे ह्याचे त्यांना

प्रशिक्षण द्यावे लागले. लोकांना डिस्काउंट, सेल, स्पेशल डील्स आवडतात हे समजून घेऊन आम्ही त्याप्रमाणे मार्केटिंग केले. लोकांकडेही वेळ कमी असल्याने इथे व्यवहार लवकर होतात.

**वृत्त-टीम:** भारतीयांव्यक्तिरिक्त इतर गिऱ्हाईकांबाबतचा अनुभव कसा असतो?

**आशुतोष:** आफ्रिकन आणि मिडल ईस्टर्न लोकांना २२ कॅरट स्टोनचे पेंडन्ट, चेन असे दागिने आवडतात. कॉकेशियन लोकांना वेडींग बँड, वेडींग रिंग्स, एंगेजमेंट रिंग्स, ब्रेसलेट अशा गोष्टी हव्या असतात. काही अमेरिकन लोकांची पत्नी भारतीय असते, काहींना भारतीय लोकांना भेट द्यायची असते. प्रत्येकाची निवड लक्षात घेऊन त्यांना ते द्यायचा आमचा प्रयत्न असतो. काही लोक सोन्याचे नाणे किंवा बार्स घ्यायला येतात. अभारतीयांची खरेदी पटकन होते, कारण त्यांना आपल्याला काय हवे ते माहिती असते.

**वृत्त-टीम:** पूर्वीच्या आणि आताच्या ज्वेलरीमध्ये काही ट्रेण्ड बदललेला तुम्हाला जाणवतो का?

**आशुतोष:** भारतामध्ये ज्या गोष्टींना मागणी असते, तीच मागणी इथे असते. ट्रेंड सेट करण्यात सोशल मीडियाचा मोठा हात आहे. इथे बसून भारतात काय ट्रेंड आहे हे लगेचच समजते. दुसरं म्हणजे पीएनजी काय ऑफर करत आहेत, ह्यावरही ट्रेण्ड ठरतो. गिऱ्हाईकांना एखादी गोष्ट आवडली तर ते उचलून धरतात. पारंपरिक दागिने अजूनही सर्वांना आवडतात. तसेच, उत्तर आणि दक्षिण भारतीयांच्या आवडीची ज्वेलरी आम्ही विकतो. गेल्या ८-१० वर्षांमध्ये वजनाला हलक्या असणाऱ्या 'तुर्कीश ज्वेलरी'चा ट्रेंड सेट झाला आहे. आम्ही २२ कॅरट सोन्याच्या दागिन्यांसोबतच १८ कॅरट सर्टिफाइड हिऱ्यांचेही दागिने ठेवतो, चांदीचे आर्टिकल्स - पूजेचे ताम्हण, इतर चांदीची भांडी, पैंजण, लहान मुलांच्या वाक्या, देवतांच्या मूर्तीही ठेवतो.

**वृत्त-टीम:** आशुतोष, तुमचे वैयक्तिक आयुष्य कसं आहे? शनिवार-रविवार दुकानातच घालवायला लागत असतील ना?

**आशुतोष:** हो, त्याची मानसिक तयारी तर झालेली होतीच पण आता त्याची सवय झाली आहे. सणावाराला पीएनजीत एक वेगळीच मजा असते - विशेषत: दिवाळीसारख्या मोठ्या सणांना. आम्हाला सोमवारी सुट्टी असते. भारतामध्ये मॅन-पॉवर जास्त असल्याने बॅकअप ठेवणे सोपे आणि सोयीचे असते पण इथेही आमची टीम खूप चांगली आहे. जेव्हा गरज पडेल तेव्हा आमची मॅनेजर स्टोअर व्यवस्थित सांभाळते.

**वृत्त-टीम:** येथील ग्राहकांच्या ऑनलाईन ज्वेलरी विकत घेण्याच्या अनुभवाबाबत काय सांगाल?

**आशुतोष:** त्याचा एक मजेशीर किस्सा आहे. २०१६ साली ओहायोतील एका कुटुंबाचा फोन आला, "गाडगीळ फॅमिली आमच्या ओळखीची आहे आणि आम्हाला आमच्या मुलीच्या लग्नासाठी तुमच्याकडूनच खरेदी करायची आहे." आम्ही त्यांना दागिन्यांचे फोटो पाठवले तसेच, व्हिडीओ कॉलवरही त्या वस्तू प्रत्यक्ष दाखवल्या. त्यांना आवडलेले सर्व दागिने इन्शुरन्स काढून पाठवले. ते त्यांना खूपच आवडले आणि त्यांनी अजून दागिने मागवले. आम्ही त्यांचा वेळ आणि श्रम वाचवल्याबद्दल त्यांनी आमचे आभार मानले. मग हळूहळू आम्ही ऑनलाईन सेलचे प्रमोशन चालू केले, त्याला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. कोरोना पँडेमिकमध्येही नियम थोडे शिथिल झाल्यावर आम्ही ऑनलाईन सेल आणि कर्बसाईड पिकअप चालू ठेवले होते. दुपारचे ३-४ तास आम्ही ३-४ जण स्टोअरमध्ये थांबून सर्व विडिओ कॉल्स हाताळायचो.

**वृत्त-टीम:** सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून पीएनजी येथे काय प्रयत्न करतात?

**आशुतोष:** गेली १५ वर्षे आम्ही येथील भारतीय समाजाशी जोडलेले आहोत. महाराष्ट्र मंडळांसारख्या सगळ्या नॉन-प्रॉफिट संस्थांबरोबर आम्ही संबंध प्रस्थापित केले आहेत. त्यांना आम्ही वार्षिक अनुदान देतो, ज्याचा उपयोग समाजकार्यासाठी होतो. त्याचा आम्हाला मार्केटिंगसाठीही उपयोग होतो आणि त्यांच्या सभासदांना आमची सर्व माहिती मिळत राहते. बे एरियात दर वर्षी नवीन गुणी कलाकारांना वाव देणारे ८-१० कार्यक्रम आम्ही प्रायोजित करतो. तसेच, स्थानिक पोलीस खाते आणि अग्निशमन खाते ह्यांच्या कार्यक्रमांत आम्ही शक्य ती मदत करीत असतो. बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या अधिवेशनातही आमचे योगदान असतेच.

**वृत्त-टीम:** आपल्या पाठिंब्याबद्दल बृ. म. मं. आपले नेहमीच आभारी आहे. भविष्यातल्या योजनांसाठी वृत्ताच्या टीमतर्फे पीएनजी ज्वेलर्सला अनेकोत्तम शुभेच्छा!

**- अनिता म. कांत व शुभदा सावरगांवकर (वृत्त-टीम)**







🏆 **BMM कॅरम स्पर्धा 2025–2026**

पुरुष व महिला – सर्व वयोगट (Singles & Doubles)

उद्दिष्ट: मराठी समुदायाला अधिक जवळ आणणे

हिवाळ्याच्या थंडगार दिवसांत घरात खेळ-मनोरंजनाची मजा काही औरच!

यंदा BMM आपल्या समुदायाला एकत्र आणण्यासाठी घेऊन येत आहे BMM कॅरम स्पर्धा 2025–2026!

अनुभवी खेळाडू असाल किंवा अगदी नवीन — कॅरम हा सर्वांना आवडणारा, सोपा आणि मजेदार खेळ.

गरम चहा, गप्पा आणि स्ट्रायकरच्या साथीत घालवलेला वेळ — मित्रमंडळी आणि मराठी समुदायासोबत जोडला जाण्यासाठी उत्तम संधी!

🎯 प्रस्तावित स्वरू

Singles

Doubles

Mixed Doubles / Lucky Doubles

🏅 प्रस्तावित स्पर्धा स्तर

१. मंडळ पातळीवरील स्पर्धा

प्रत्येक मंडळ आपल्या सदस्यांसाठी स्वतंत्र स्पर्धा आयोजित करेल.

२. प्रादेशिक स्पर्धा

शेजारील मंडळांतून विजेते/उपविजेते एकत्र येऊन स्पर्धा.

३. राष्ट्रीय स्पर्धा

TBD – लवकरच माहिती जाहीर करण्यात येईल

📍 प्रस्तावित स्थळ

कम्युनिटी हॉल

घरगुती / बेसमेंट सेटअप

📅 प्रस्तावित वेळ

हिवाळ्यातील कोणताही शनिवार–रविवार

📞 संपर्क

तुषार वेदांती – 484-354-6951

गौरव पाटवर्धन – 573-202-3626


AVANA
SENIOR CARE
Pune, India
PEACE OF MIND FOR YOU & YOUR LOVED ONES
Professional senior care with a personal touch.
Co-Founded by Ms Niharika
MHA- Mount Sinai Hospital, NY
Senior Living Mgt - Cornell University, NY
SERVICES WE OFFER
Independent Living
Assisted Living
Day Care
Wellness & Rehabilitation
Medical Support & Emergency Management
Pet Therapy & Companionship
TRY BEFORE YOU DECIDE
BOOK A TRIAL STAY TODAY!
+91 9090070782
avanaseniorcare.com

We cater to Maharashtrian Artists in North America.
Providing a platform to share their artwork including Paintings, Sketches, Photographs & Digital art.

Collaborating with BMM, we publish artist's paintings for Marathi mandal members, showcasing their work & generating revenue. The sale of artwork benefits both BMM & Mandals financially.



***Tiger Lilies***

**Artist: Vinita Mohite**
Dimensions: 16” x 20”
Medium: oil on Aluminum panel.
Price: Not for Sale
Mandal: Seattle Maharashtra Mandal



***Peaceful Dots***

**Artist: Priya Kulkarni-Moghe**
Dimension: 14 inch circular
Medium: Acrylic & mirror work
Price : not for sale but Orders are welcome
Mandal: Arizona PMMM



***Tides of Life***

**Artist: Bharti Gorkar**
Dimensions: 18”x18”
Medium: charcoal
Price: $800
Mandal: Seattle Maharashtra Mandal



***Hampi, Karnataka, ancient stone structures. Chariot***

**Artist: Mangala Tata**
Dimensions: 10”x12”
Medium: Watercolor
Price: $150
Mandal: MMLA



***In the Pink***

**Artist: Meghana Mitragotri**
Dimensions: 21” x 14”
Medium: Watercolor
Price: Not for Sale



***Unhurried***

**Artist: Aparna Deshpande**
Dimensions: 6”x9”
Medium: Ink & watercolor
Price: Not for Sale
Mandal: Marathi Vishwa NJ

Pay: zelle@bmmonline.org or paypal@bmmonline.org | Contact: artists@bmmonline.org
Buyers & Sellers Pl fill out forms at https://bmm2.page.link/artists
*Buyer is responsible for shipping and handling.